|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : ५२ सोमवार दि. ३० डिसेंबर २०२४ ते रविवार दि. ५ जानेवारी २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड







## नराधम वेटरने चिमुकलीशी दुष्कृत्य करून घरात डांबले पाप लपवण्यासाठी दोघींना ठार मारून पिंपात कोंबले





राजगुरुनगर/क्राईम रिपोर्टर

**संत महात्म्यांचे संस्कार आणि थोर समाजसुधारकांचा आदर्श ठेवून वाटचाल करणाऱ्या सुसंस्कृत महाराष्ट्राला सध्या झालेय तरी काय असा प्रश्न पडतोय. कारण महाराष्ट्रात वासनांध नराधमांनी सध्या हैदोस घातला आहे. बदलापुरात शाळकरी मुलींवर तिथल्याच कर्मचाऱ्याने अतिप्रसंग केल्याची घटना ताजी असतानाच कल्याणमध्ये एका नराधमाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केले. त्या पाठोपाठ पुण्याच्या राजगुरूनगरमध्ये एका वेटरने दोन लहान मुलींना आपल्या घरात बोलावून त्यातील ऐकीवर लैंगिक अत्याचार करून आपले पाप लपवण्यासाठी दोन्ही मुलींची हत्या केली. सध्या हा नराधम पोलीस कोठडीत असून संतप्त नागरिकांनी त्याचे एन्काऊंटर करण्याची मागणी केली आहे. विद्येचे माहेरघर अशी ओळख असलेल्या पुण्यात अशा संतापजनक घटना घडाव्यात यासारखे दुर्दैव नाही. महाराष्ट्रात घडणाऱ्या या सर्व घटनांच्या तपशीलवार नजर टाकल्यास यातील बहुतेक आरोपी हे परप्रांतीय आहेत. त्युपी, बिहार, पश्चिम बंगाल, राजस्थान या राज्यातून इथे पोट भरायला आलेल्या काही लोकांमध्ये इतकी विकृती निर्माण झाली आहे कि त्यांना कोणत्याही वयोगटातील स्त्रीमध्ये एक उपभोगाची वस्तू दिसू लागलीय. त्यामुळे नजरेत विखर घेऊन समाजात वावरणाऱ्या या नाराधमांचे एक तर डोळे फोडायला हवेत किंवा त्यांचे लिंग छाटून त्यांना कायमचे नपुंसक करायला हवे, अशी संतप्त मागणी केली जात आहे. पण समाजात इतका लैंगिक व्याभिचार का वाढला याचाही विचार करायला हवा.**

पूर्वी नाटक-सिनेमातून पुरुषांच्या मनात स्त्री बद्दल आकर्षण निर्माण व्हायचे, पण आता मोबाईलमध्ये इतक्या अश्लील साईट असतात कि त्यातील क्लीप बघून कोणत्याही पुरुषाच्या भावना चालवून तो वासनांध बनू शकतो आणि वासनेच्या भरात कोणतेही दुष्कृत्य करू शकतो. परप्रांतातून आलेले मजूर हे एकटे रहात असतात. त्यातील काहींना मोबाईलवर अश्लील क्लीप बघण्याचे व्यसन जडलेले असते आणि अशाच लोकांकडून लैंगिक अत्याचाराच्या घटना घडत असतात. दोन तीन वर्षापूर्वी केंद्र सरकारने इंटरनेटवरील काही अश्लील साईट ब्लॉक केल्या होत्या. पण अजूनही हजारो अश्लील साईट नेटवर आहेत आणि त्या सर्च करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यात तरुणांची संख्या अधिक आहे. आणि हे सर्व बघूनच पुरुषांच्या भावना चाळवतात आणि ते दुष्कृत्य करायला प्रवृत्त होतात, तेंव्हा सरकारने इंटरनेटवरील या पोनोग्राफीबाबत कठोर कायदा करावा, तरच समाजातील लेकीबाळींची अब्रू सुरक्षित राहील.

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या बारमध्ये काम करणाऱ्या वेटरने नऊ वर्षाच्या मुलीवर अत्याचार करत तिच्यासह आठ वर्षीय बहिणीला पाण्याच्या बॅरलमध्ये बुडवून मारल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी सकाळी उघडकीस आला. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. कार्तिकी सुनील मकवाने (वय ९ वर्षे), दुर्वा सुनील मकवाने (वय ८ वर्षे, दोन्ही रा. राजगुरुनगर) अशी मृतांची नावे असून, याप्रकरणी अजय दास (वय ५४ वर्षे, पश्चिम बंगाल) याला अटक करण्यात आली आहे. ...पान २ वर

## प्रेयसी सोडून गेल्याने संतापला फार प्रियकराने केले तिच्या बापाला ठार



इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

**'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये राहणारी जोडपी केवळ आकर्षणातून एकत्र आलेली असतात. त्यामुळे आपण ज्याच्याशी 'लिव्ह इन'मध्ये राहतो त्याची पार्श्वभूमी कुणी तपासत नाहीत, पण नंतर त्याचे खरे गुण समजल्यावर पश्चाताप होतो. इचलकरंजीच्या आझाद गल्लीत रहाणाऱ्या जावेदची मुलगी सुरय्या हिच्या बाबतीतही तसेच झाले. ती ज्याच्याशी 'लिव्ह इन'मध्ये राहत होती तो पुढे दारुडा निघाला. त्यामुळे त्याला सोडून ती आई-वडिलांकडे आली. मात्र तिचा प्रियकर तिच्या आई-वडिलांच्या घरी जावून तमाशा करू लागला आणि एके दिवशी त्याने तिच्या बापाचीच हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

इचलकरंजी शहरातील तीन बत्ती चौकाजवळील आझाद गल्ली येथे जावेद बाबु लाटकर हे आपल्या पत्नी मुलगा मुलीसह राहयला आहेत. ते आपला छोटा मोठा व्यवसाय करून आपल्या कुटूंबाचा उदर निर्वाह करीत होते. त्यांची मुलगी सुमैय्या ही निकाह योग्य झाली होती परंतु कुठे तिचा निकाही लवकर जुळून येत नव्हता.त्यातच तिचे वय होत असताना ती षटकोन चौक येथे राहत असलेल्या सिकंदर शेख याच्या बरोबर तिची ओळख झाली. सिकंदर शेख याचे षटकोन चौक परिसरात चिकन विक्रीचा धंदा असल्याने त्याची परिस्थीती तशी सधन असेल असे सुमैय्याला वाटले. ते दोघे ही प्रेमात पडले. त्याच्या भेटीगाठी होऊ लागल्या. ते दोघे ही एकमेकांना पसंत करीत असल्याने त्यांनी निकाह न करताच एकत्र राहण्याचा विचार केला. ते दोघे ही गेल्या वर्ष दीडवर्षापासून ते दोघे ही रिलेशनशीपमध्ये राहू लागले. या दरम्यान सुमैय्याला सिकंदरचा स्वभाव चांगला ओळखता आला. तो पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे त्याचेवर पोलीस ठाण्यात गुन्हे आहेत. त्याची भागात दशहत आहे. तो तलवार घेऊन कोणाला ही मारायला जातो हे तिला आधी माहित नव्हते. सिकंदर हा सुरूवातीला तिच्याशी चांगला वागत होता. परंतु अलिकडे तो दारू पिऊन येवून तिला मारहाण करीत शिव्या देत त्रास देत होता. त्यामुळे सुमैय्या ही त्याच्या त्रासाला वैतागलेली होती. निकाह न करताच आपण त्याच्याबरोबर रहात असताना देखील तो आपल्याला त्रास देत आहे. आपण त्याच्याशी प्रामाणीकपणे राहून देखील तो आपला गैरफायदा घेत आहे हे तिने ओळखले होते. ...पान २ वर

## घटस्फोटाच्या वादामुळे पोलीस संतापला पत्नी मुलासह चौघांवर गोळीबार केला



हिंगोली/क्राईम रिपोर्टर

**माणसाच्या रागाला डोळे नसतात. एखादा माणूस चिडला कि त्याच्या हातून काहीही घडू शकते. हिंगोलीत एका पोलिसाने रागाच्या भरात आपल्या पत्नीसह सासू मेव्हणा आणि स्वतःच्या २ वर्षाच्या मुलावरही गोळीबार केला. यात पत्नीचा मृत्यू झाला तर इतर तिघे जखमी आहेत. या प्रकरणी आरोपी पोलिसाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तो फरार आहे.**

हिंगोलीपोलिस दलात कार्यरत असलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्याने फायरिंग केल्याने पत्नीचा मृत्यू झाला. तर मुलगी, सासू व मेव्हाण गंभीर जखमी झाला. ही घटना २५ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास घडली. घटनास्थळी पोलिस ...पान २ वर

## चुलत भाऊच काळ बनून आला जमिनीच्या वादातून दोघांचा खून केला



सोलापूर (बार्शी)/क्राईम रिपोर्टर

**ग्रामीण भागात शेती हेच उपजीविकेचे साधन असल्याने शेतकरी आपल्या शेतजमिनीवर पोटच्या पोरासारखे प्रेम करतो. त्यामुळे जमिनीवरून वाद विवाद होतात आणि हे वाद एखाद्याच्या प्राणावरही बेतू शकतात. सोलापूर जिल्ह्याच्या बार्शी तालुक्यातील भोयरे गावात २ चुलत भावांमध्ये एकाच्या शेतातून दुसऱ्याच्या शेतात जाण्यासाठी वाट देण्यावरून वाद होता. हा वाद कोर्टात गेला, पण निकाल लागेपर्यंत दोघांनाही धीर नव्हता. भांडणे सुरूच होती आणि एके दिवशी सौदागर पाटील याने याच भांडणातून आपला चुलत भाऊ किसान पाटील याची पत्नी व मुलाची निर्घुण हत्या करून किसान पाटील यांना जखमी केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुक्यात भोयरे येथे किसन गोवर्धन पाटील हे पत्नी सिंधु आणि मुले सागर आणि नानासाहेब याचेसह राहयला आहेत. त्याची गावात पाच ते सहा एकर शेती आहे. त्याच्या शेतालगतच त्याच्या भावकीतील सौदागर पाटील याची ही शेत जमीन आहे. सौदागर पाटील आणि किसन पाटील हे नात्याने चुलत भाऊ लागतात. आडयाला आड आणि बांध्याला बांध लागून असल्याने भावकीतील भांडणे ही रोज कोणत्या ना कोणत्या कारणातून ...पान २ वर

## मोबाईल चोरीवरून दोघांत वाद झाला एका चोराने दुसऱ्या चोराचा खून केला



अहिल्यानगर/क्राईम रिपोर्टर

**श्रीरामपूरमध्ये चोऱ्या करून उदरनिर्वाह करणाऱ्या कमलेश पवार याची टम्या अडांगळे या दुसऱ्या चोराशी दुष्मनी होती. एकेदिवशी कमलेशच्या मेव्हण्याचा मोबाईल टम्याच्या टोळीने चोरला या गोष्टीचा कमलेशला भयंकर राग आला. त्याने टम्या याच्याकडे जाऊन मोबाईल मागितला, पण त्याने नकार दिला. त्यावरून दोघांमध्ये भांडण झाले. याच भांडणाचा राग मनात ठेवून टम्याने कमलेशची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील यत्ते ग्राऊंडजवळील प्रभाग ७ मध्ये कमलेश उत्तम पवार हा त्याच्या कुटुंबासह रहात होता. त्याला दोन बायका, काही मुलं-बाळं असा एकंदर त्याच्या कुटुंबाचा पसारा. श्रीरामपूर शहरात चोऱ्या-माऱ्या करणे, इतर टोळीतील टारगटांशी भांडण करणे हाच त्याचा उद्योग. श्रीरामपूर शहर हे रेल्वे लाईनच्या दोन्ही बाजूला वसलेले आहे. पूर्वी या ...पान २ वर

## दागिन्याचा मोह प्राणावर बेतला सालगड्याने मालकाचा जीव घेतला



सोलापूर (मोहोळ)/इरप्पा बोरीकरजगी

**सोन्याचा मोह प्रत्येकाला असतो. त्यामुळे काही लोक सोन्याचे दागिने सतत अंगावर घालतात. पण कधी कधी हाच मोह त्यांच्यासाठी प्राणघातक ठरू शकतो. मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडीतील मुळ रहिवाशी असलेल्या पण सध्या पुण्यात रहाणाऱ्या कृष्णा चामे यांच्या बाबतीतही तसेच झाले. त्यांना अंगावर दागिने घालण्याचा शौक होता. मात्र या दागिन्यावर त्यांचा सालगडी सचिन गिरी याचा डोळा होता. अखेर संधी साधून सचिनने मालकाच्या डोक्यात हातोड्याचे घाव घालून त्यांची हत्या केली आणि मृतदेहाचे तुकडे करून पुरले. मात्र तपासानंतर तो पकडला गेला आणि त्याने गुन्हा कबूल केला.**

मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडी येथील कृष्णा चामे हे कुटुंबासमवेत काळेवाडी, पुणे येथे राहत होते. यल्लमवाडी येथे दहा ते पंधरा दिवसातून येऊन जाऊन ते शेती करत होते. शेतातील द्राक्षांचा बागेचे औषध फवारणी व इतर शेती कामासाठी त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील सांगवी येथील सचिन भागवत गिरी याला सालगडी म्हणून कामाला ठेवले होते. दरम्यान १४ डिसेंबर रोजी नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातून दोन अज्ञात व्यक्तींनी दुचाकीवरून येऊन चामे यांच्या ...पान २ वर

## चारित्र्याच्या संशयावरून वेठीस धरले गर्भवती पत्नीला पतीनेच ठार मारले

छत्रपती संभाजीनगर/क्राईम रिपोर्टर

**संशयाचे भूत सहसा माणसाच्या मानगुटीवरून उतरत नाही. ग्वाहलेरमध्ये राहणारी सिमरन पतीच्या जाचाला कंटाळून आपल्या ४ वर्षाच्या मुलासह महाराष्ट्रातील वाळूंजमध्ये पोटा पाण्यासाठी आली. तिथे मजुरी करून आपला व आपल्या मुलाचा उदरनिर्वाह करू लागली. याच दरम्यान तिची जहिरशी ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले आणि दोघांनी प्रेमविवाह केला. मात्र जिहिरच्या आईला हा विवाह मान्य नव्हता. कारण सिमरन वयाने मोठी होती. त्यामुळे जहिरची आई सिमरन विरुद्ध आपल्या मुलाचे कान भरू लागली. त्यातच सिमरन गर्भवती राहिली, पण हे मुल आपले नाही असे जहिर सांगू लागला. त्यावरून भांडणे होऊ लागली. सिमरनने हा प्रकार तिच्या आईला सांगितला. आईने जहिर व त्याच्या आई विरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. या घटनेचा जहिरला राग आला आणि रागाच्या भरात त्याने सिमरनची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी जहिर व त्याच्या आईला अटक केली आहे.**

मध्यप्रदेशतील ग्वाहिलर येथील सिंधी कॅम्प वसाहतीत परशराम बाथम हे पत्नी फुलवंती मुलगी सिमरन आणि एक मुलगा याचेसह राहयला आहेत. गेल्या सहा वर्षापूर्वी सिमरन हिचा विवाह बाबा सय्यद याच्याशी झाला. त्या दोघांचा संसार फुलत ...पान ६ वर

## विवाहित प्रेयसीला त्याने भयंकर शिक्षा दिली तिच्या मुलाला ठार मारून आत्महत्या केली

संगमनेर/क्राईम रिपोर्टर



**आजकाल माणूस इतका क्रूर बनला आहे कि शुल्लक कारणावरून एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाही. त्याच बरोबर एखाद्यावर जर त्याचा राग असेल आणि त्याच्यावर सूड उगवता आला नाही त्याच्या कुटुंबावर सूड उगवतो. संगमनेर जवळच्या गुंजाळ वाडीत एका तरुणाने आपल्या विवाहित प्रेयसी आणि तिच्या पतीला धडा शिकवण्यासाठी तिच्या मुलाची हत्या करून आत्महत्या केली.**

पुणे जिल्ह्यातील अपहरण झालेल्या १२ वर्षीय विद्यार्थ्याचा मृतदेह मंगळवारी संध्याकाळी संगमनेर तालुक्याच्या गुंजाळवाडी गावच्या शिवारातील विहिरीत आढळून आला. त्याच्या अपहरण प्रकरणी संगमनेरातील २७ वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल असताना त्याचाही मृतदेह मंगळवारी सकाळी घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या दोन्ही घटनांप्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद आहे. मात्र २७ वर्षीय तरुणाने आपली विवाहित प्रेयसी आणि तिच्या पतीला धडा शिकवण्यासाठी या १२ वर्षीय मुलाची हत्या केल्याचं सांगितलं जात आहे. अपहरण झालेल्या मुलाच्या वडिलांनी मुलाचे अपहरण झाल्याची फिर्याद ११ डिसेंबरला पारगाव कारखाना पोलिस ठाण्यात दिली होती. दाखल गुन्हा मागे घेण्यासाठी माझ्या मुलाला आमिष दाखवून माझे कायदेशीर रखवालीतून माझ्या संमतीशिवाय पळवून नेले आहे, असेही वडिलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. ११ डिसेंबरला दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास मौजे निरगुडसर गावच्या हद्दीतील एका विद्यालयातून आरोपीने विद्यार्थ्याचे अपहरण केले होते. आरोपी हा संगमनेरातील रहिवासी असल्याने पारगाव कारखाना पोलिस संगमनेरात तपासासाठी आले होते. ...पान २ वर

30 DECEMBER 2024 To 05 JANUARY 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/28/2024 8:32 PM Page 1



पान १ वरून...

## नराधम वेटरने चिमुकलीशी दुष्कृत्य...

मुकवाने दाम्पत्य मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात. कार्तिकी व दुर्वा या दोन्ही बहिणी घराजवळच बुधवारी दुपारी खेळत होत्या. दरम्यान, अचानकपणे त्या गायब झाल्या. कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला मात्र, त्या मिळून आल्या नाहीत. त्यानंतर सायंकाळी खेडपोलिसात दोन्ही मुली बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन खेड पोलिस आणि पुणे क्राइम ब्रँचने संयुक्तपणे तपास सुरू केला. परंतु, हाती काही लागले नाही. पोलिसांनी ज्या परिसरात मुली खेळ होत्या, त्या परिसरातील घरांची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली. मकवाने दाम्पत्य राहत असलेल्या चाळीलगतच्या बारमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या खोलीची झडती घेतली. त्यावेळी अवघे गुडघाभर पाणी असलेल्या एका बॅरलमध्ये या दोन्ही बहिणी मृत अवस्थेत मिळून आल्या. या घटनेमुळे सर्वजण हादरून गेले. या खोलीत राहणाऱ्या अजय दास (५४) याच्यावर संशय आल्याने पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. मुलींचा खुन करुन परराज्यात पळून जात असताना पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपीला एका लॉजवरून दास याला अटक केली. तपासामध्ये त्याने गुन्ह्याची कबुली दिली. दोन अल्पवयीन मुलींपैकी एकीवर अत्याचार करून त्या दोघींचा निर्घृण खून करणाऱ्या नराधमाचा एन्काउंटर करा, अशी मागणी मृत मुलीच्या आई- वडिलांसह नातेवाइकांनी केली. सकाळी अकरा वाजल्यापासून खेड पोलिस ठाण्यासमोर नातेवाइक व नागरिकांनी दिवसभर ठिय्या आंदोलन केले. आरोपीला आमच्या ताब्यात द्या, एन्काउंटर करा, फाशी द्या, अशी मागणी केली. दरम्यान, तहसीलदार ज्योती देवरे, आमदार बाबाजी काळे यांनी नातेवाइक व आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन शांत करण्याचा प्रयत्न केला. आरोपीला फाशी देण्याची मागणी शासन दरबारी करू, मात्र संतप्त झालेले नातेवाइक ऐकत नव्हते. दिवसभर पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरूच होते.

## प्रेयसी सोडून गेल्याने संतापला...

हल्ली सिकंदर हा रोज दारू पिऊन येऊन तिला मारहाण करीत होता. त्यामुळे भांडणात ती त्याला तु फक्त माझा झोपण्यापुरता उपयोग करून घेत आहेस तुझे काम झाले की तु मला वाऱ्यावर सोडत आहेस असे म्हणून ती ही त्रागा करीत होती. एक तर ती आपल्या आई वडिलांच्या इच्छेविरूध्द त्याच्याबरोबर रहात होती. त्यामुळे सिकंदरने कितीही त्रास दिला तरी तिला माहेरला जायला वाट राहिलेली नव्हती. म्हणून ती त्याचा त्रास सहन करीत होती. तिच्याबाबत दुरून डोंगर साजरे असे झालेले होते. अगोदरच सिकंदर आणि आताचा सिकंदर यात तिला फरक जाणवत होता. रोज दारू पिणे, धंदयाकडे लक्ष न देणे,भागात व परिसरात दादागिरी करून दशहत माजविणे हा त्याचा ठरलेला उदयोग होता. त्यामुळे ती ही वैतागलेली होती. दररोजच्या त्रासाला कंटाळून तिने सिकंदर हा आपल्याला कसा आणि किती त्रास देत आहे याची कल्पना आपल्या आईला दिली. तिने ही गोष्ट आपला नवरा जावेद यांना सांगितली. जावेद यांनी काही दिवस वाट पाहिले. त्यानंतर तिने सुमैय्याला आपल्या घरी येण्यास सांगितले. आई वडिलांनी सांगितल्यानंतर सुमैय्या ही आपल्या माहेरी आई वडिलांच्याकडे येवून राहू लागली. सुमैय्या ही न सांगता आपल्या माहेरी निघून गेल्याने सिकंदर हा तिच्यावर चिडला. तो वारंवार आझाद गल्लीत जावून सासु सासरे याच्याबरोबर भांडण काढून सुमैय्याला आपल्याबरोबर पाठवून दया नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील अशी धमकी दिली. सुमैय्या ही त्याचेबरोबर यायला तयार न झाल्याने तो दोन तीन दिवसातून तिच्या घरी जावून तिला तसेच सासु सासऱ्यांना त्रास देवू लागला. त्याच्या या त्रासाला जावेद आणि त्याचे कुटूंब वैतागलेले होते. काय करावे आणि काय नको असे त्यांना झाले होते. सिकंदर हा त्यांना सारखा धमकावत होता. सुमैय्याला त्याच्याबरोबर पाठवून दिले नाही तर बघून घेण्याची भाषा करीत होता. त्यामुळे जावेद यांनी मुलगी सुमैय्याला आपल्या दुरच्या नातेवाईकाकडे पाठवून दिले. गेल्या वर्षभर ती त्याच्याकडे राहत होती. सिकंदर हा सुमैय्या ही येत नसल्याने अगोदरच तिच्यावर चिडला होता.तर सासरे जावेद यांनी तिला मुद्दामच दुसरीकडे कुठे तरी पाठवून दिले आहे. त्यांनीच तिला कुठे तरी लपवून ठेवले आहे असा त्याचा गैरसमज झाला होता. हल्ली तर तो रोज आझाद गल्लीत जावून सासरे जावेद यांना शिवीगाळ करीत होता. तो दारू पिऊन येत असल्याने आणि तो सराईत गुन्हेगार असल्याने जावेद हे त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. याचा सिकंदरने वेगळाच अर्थ काढला. सासरे जावेद आणि त्याचे कुटूंब आपल्याला घाबरत आहेत. त्यामुळे आपण काही ही केले तरी चालते त्यांना धडा हा शिकवलाच पाहिजे असे सिकंदर याने मनाशी ठरविले. त्याने ही गोष्ट आपल्या जवळच्या एका मित्राला सांगितली.सिकंदरने त्या मित्राला सांगितले की, तु फक्त माझ्याबरोबर हत्यार घेऊन चल. पुढचे मी बघतो. त्या दोघांनी तसा प्लॅन केला. बुधवार दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी नाताळची धामधुम चालू होती. त्या दोघांनी इथेच्छ दारू ठोसली. दारूच्या नशेतच ते आझाद गल्लीतील जावेद याच्या घरासमोर आले. रात्रीचे १० वाजले होते. दारूच्या नशेत त्या दोघांनी आपली मोटार सायकल बाजुला लावली. सिकंदर हा जावेद याच्या घरासमोर उभा राहून त्यांना अर्वाच्च भाषेत शिव्या देऊ लागला. सासरे जावयाचे रोजचेच भांडण चालू आहे म्हणून शेजाऱ्यांनी ही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. सिकंदर हा आपल्या हातात तलवार घेऊन त्यांना धमकावत भांडणासाठी उकसावत होता. बराच वेळ तो शिव्या देत जावेद याच्या घरासमोरील रस्त्यावर थांबला होता. ते बाहेर येत नसल्याचे बघून तलवार त्याने आपल्या मित्राकडे दिली. दारूच्या नशेत तो सुमैय्या हिला दुसऱ्याबरोबर पाठवून दिला आहेस काय? असे म्हणत तो जास्तच शिवीगाळ करू लागल्यावर जावेद याची बायको बाहेर आली. त्याला तेथून निघून जाण्यास सांगितले. तरी ही तो तेथे उभा राहून शिवीगाळ करू लागला. हे बघून रागाच्या भरात जावेद हे बाहेर आले. त्यांनी सिकंदरला तु आमच्या दारासमोर उभा राहून आम्हाला का शिवीगाळ करतो आहेस. तुझी बायको कुठे गेली आहे ते तु बघ जा म्हणत त्यांनी त्याच्या कानाखाली वाजवली. त्यावेळी सिकंदरने त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण करीत ढकलून दिले. जावेद हे रस्त्याकडेला असणाऱ्या गटारीजवळ जावून पडले. त्याची बायको त्यांना सोडवायला आली. तरी सिकंदर हा त्यांना मारहाण करीत होता. त्यांना मारहाण करीत असतानात त्याने मित्राला तलवार काढ.साल्याला आता संपवितोच म्हटले. त्याच्या रागाचा पारा चढलेला होता. त्याने त्यावेळी मागचा पुढचा विचार न करता बाजुला पडलेला मोठा दगड उचलला आणि जावेद याच्या तोंडावर तीन चार वेळा जोरात हाणला. तसेच तो दगड त्याच्या हातातून बाजुला पडल्यावर त्याने जवळच पडलेली फरशी घेतली आणि ती जावेद याच्या डोक्यात हाणली. यात तडफडतच त्याचा जागी मृत्यु झाला. जावेद याच्या घरासमोर का आरडा ओरडा होत आहे म्हणून लोक येत होते. त्यांना येत असल्याचे बघून सिकंदर आणि त्याच्या मित्राने त्याची दुचाकी गाडी तेथच टाकून त्यांनी पलायन केले. घटनास्थळी बघ्यांची गर्दी वाढली होती. जावेद यांना एका रिक्षात घालून इंदिरा गांधी मेमोरियल रुग्णालयात आणले. तर इकडे घटनास्थळी सिकंदरने सोडून गेलेल्या मोटार सायकलीची जमावाने तोडफोड केली. त्याच्या गाडीचा चक्काचुर करून टाकला. जावेद यांना उपचारासाठी रुग्णालयात आणल्यानंतर तेथील डॉक्टरांनी तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. ही बातमी आझाद गल्लीत समजताच रुग्णालय परिसरात लोकांनी गर्दी केली. या घटनेची माहिती शिवाजीनगर पोलीस स्टेशनला मयत जावेद याचा भाऊ दिलावर बाबु लाटकर यांनी देवून सिकंदर शेख याच्या विरोधात फिर्याद दाखल केली. पोलीसांनी घटनास्थळी येवून घटनास्थळाची पाहणी केली. घटनास्थळी मोडतोड झालेली मोटार सायकल आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मयताचे शवविच्छेदन आयजीएम रुग्णालयातच करण्यात आले.दिलावर लाटकर यांनी घटनेची माहिती पोलीसांना दिलेली होती. त्यामुळे ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती पोलीसांना मिळालेली होती. या घटनेनंतर सिकंदर शेख हा पळून गेला असल्याने शिवाजीनगर पोलीस त्याचा शोध घेत होते. या घटनेचा तपास कोल्हापूर येथील स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत असल्याने सिकंदर शेख हा कराड येथील बस स्टॅन्डवर येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलीसांना मिळाल्यावर पो.निरी. रविंद्र कळमकर आणि पो.उप.निरी.शेष मोरे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांच्या एका पथकाने कराड बस स्थानकात सापळा रचून सिकंदर शेख याला ताब्यात घेतले. त्याला शिवाजी नगर पोलीसांच्या ताब्यात त्यांनी दिले. शिवाजीनगर पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने कोणतेही आढेवेढे न घेता आपला गुन्हा कबुल केला. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर दिलावर बाबु लाटकर (वय ४०) रा.तीन बत्ती चौक, आझादनगर इचलकरंची यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जावेद बाबु लाटकर (वय ४५) रा.तीन बत्ती चौक आझादनगर इचलकरंजी याच्या खुन प्रकरणी सिकंदर मोहमदअली शेख (वय ३२) रा.षटकोन चौक इचलकरंजी याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याला पोलीसांनी इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता. मा.न्यायालयाने सिकंदर शेख याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान या घटनेतील दुसऱ्या संशयीताचा शोध पोलीस घेत आहेत. या घटनेचा तपास पोलीस अमंलदार संजय कुंभार, प्रशांत कांबळे नवनाथ कदम. महेश पाटील, सागर चौगुले, यशवंत कुंभार यांनी करून संशयीत सिकंदर शेख याला जेरंबद केले. या घटनेचा पुढील तपास शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे पो.निरी. सचिन पाटील याच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस करीत आहेत.

## घटस्फोटाच्या वादामुळे पोलीस...

अधिकारी दाखल झाले आहेत. वसमत शहर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी विलास बळीराम मुकाडे यांचे हिंगोली शहरातील प्रगतीनगरात घर आहे. बुधवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास ते घरी आले असता त्यांनी पत्नीवर गोळी झाडली. त्यानंतर मुलगा, सासू व मेव्हण्यावरही गोळीबार केला. यात पत्नीचा मृत्यू झाला असून मुलगा, सासू व मेव्हणा जखमी झाले. जखमींवर जिल्हा रूग्णालयात उपचारकरून नांदेडला रेफर करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोलिस निरीक्षक श्यामराव डोंगरे आदींचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेनंतर विलास मुकाडे हा पळून गेला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. घटनेचे कारण समजू शकले नाही.

## चुलत भाऊच काळ बनून आला...

होत होती. सागर पाटील हा आपली शेती बघत असल्याने आणि तो शेती कामात आपल्या वडिलांना मदत करीत होता. सौदागर पाटील यांना ही एक मुलगा असल्याने त्याचा मुलगा ही त्यांना शेती कामात करीत होता. भावकीतील तिढा या दोन्ही पाटील कुटूंबात गेल्या अनेक वर्षापासून धुसफसत होता. सौदागर पाटील याची शेती रस्त्या लगत आणि किसन पाटील याची शेती सौदागर पाटील याच्या शेतीला लागून थोडी मागे असल्याने किसन पाटील यांना त्याच्या शेतात जायला यायला सौदागर पाटील याच्या शेतीच्या बांधावरून आणि पायवाटेवरून जायला यायला लागत होते. गेल्या काही वर्षापूर्वी किसन पाटील आणि सौदागर पाटील याचेत किरकोळ कारणावरून वाद होऊन हाणामारी झालेली होती.त्यामुळे या दोघा चलुत भावात हल्ली विस्तव ही जात नव्हता.त्याचेत कोणत्या ना कोणत्या कारणातून कायम भांडणे वाद विवाद होऊ लागला होता. या कारणातून सौदागर पाटील हे किसन पाटील आणि त्याच्या घरच्या लोकांना आपल्या शेतातून त्यांना जाण्या येण्यास वाट देत नव्हते. किसन पाटील हे बांधावरून जरी चालले तरी ते त्यांना अटकाव करीत होते. सौदागर हे आपल्याला शेतात जाण्यास वाट देत नाही म्हणून त्याचेत वाद भांडणे हाणामारी बऱ्याच वेळेला झाली होती. त्याचा हा वाद भोयरे गावातील पंचायतीत ही पोहचला होता. तेथे ही काही पंचमंडळीनी यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला परंतु तो वाद काही केल्या मिटला नाही. किसन पाटील यांना त्याच्या शेतातून जाण्या येण्यास सौदागर यांनी अडवणुक केली तरी किसन पाटील हे दांडगाव्याने ही वाट समाईक आहे आणि ती वर्षानुवर्ष चालत आलेली आहे यात तू कोण आम्हाला अडवणार म्हणत जात येत होते. आता या भांडणात दोघांच्या घरच्या बायका माणसांनी ही भाग घ्यायला सुरवात केली होती. त्यामुळे हा वाद काही केल्या मिटायला तयार नव्हता. दोघांच्या ही घरच्या बायकांनी भांडणात तेल ओतण्याचेच काम केलेले होते. त्यामुळे प्रत्येक वेळेला शिवीगाळ आणि हातात सापडेल त्या वस्तुनी मारहाण होत होता. बऱ्याच वेळेला पोलीस स्टेशनला हा वाद गेला की पोलीस ही दोन्ही कडच्या लोकांना समजावून सांगत त्यांना परस्पर हा विषय मिटवून घेण्याचा सल्ला दिलेला होता. नाही तर तुमच्या कडील कागदपत्राच्या अधारे तुम्ही हा वाद कोर्टात घेऊन जावा तेथे तुम्हाला न्याय मिळेल उगाच मारामारी भांडणे करू नका असे पोलीसांनी त्यांना सांगितले होते. सौदागर पाटील यांनी जमीनीचा वाद हा हल्ली कोर्टात नेला होता. त्यामुळे दोघांच्या ही वकिलांनी ही केस चालू असे पर्यत जैसे थे परिस्थीती ठेवावी हा निर्णय कोर्टाकडून घेतला होता. त्यामुळे किसन पाटील हे दोघात असणाऱ्या बांधावरून ये जा करीत होते. यात त्यांना कोणती ही अडचण नव्हती. शेत जमीनीच्या वादात कोर्टाकडून लवकर तोडगा निघणार नाही हे दोघांना ही माहित होते. जरी एकाच्या बाजूने निकाल लागला तरी दुसरा वरच्या कोर्टात जाणार हे सत्य होते. त्यामुळे सौदागर पाटील यांना किसन हे बांधावरून जरी शेतात चालले किंवा त्यांनी पायवाटेवरून जरी बैलगाडी घातली तरी त्याच्या तळपायाची आग मस्तकात जात होती. त्यामुळे ते सारखे किसन पाटील आणि त्याच्या घरच्या लोकांची शेतात जाण्या येण्यास अडवणुक करीत होते. वाद हा वादच असतो तो आपसात मिटवला गेला तर त्यातून मार्ग निघातो नाही तर हा वाद काही केल्या मिटत नाही असे त्या दोघांना ही अनेकांनी सांगून पाहिले होते.भांडणात किसन पाटील याची बायको सिंधू पाटील यांनी मागे एकदा दोनदा सौदागर पाटील याची बायको सोनाली पाटील यांना मारहाण केलेली होती. त्यामुळे ही जखम सौदागर याच्या मनात होती. ते याचा डाव कुठे तरी काढायला बघत होते. परंतु तशी संधी त्यांना मिळत नव्हती. किसन पाटील याच्या घरातील कोणाला ही बघितले तर त्याच्या तळ पायची आग मस्तकात जात होती. ते मुद्दामच त्यांना जाता येता शिवीगाळ करीत होते. त्यामुळे सिंधू पाटील यांनी जशास तसे उत्तर म्हणून सोनाली पाटील यांना मारहाण केलेली होती. दोन्ही कुटूंबातील हा वाद हा हल्ली विकोपाला गेला होता. भांडण काढण्यासाठी दोघांना ही निमित हवे होते. सौदागर पाटील हा तर किसन पाटील याच्यावर चिडूनच होता. त्यातच किसन पाटील यांचा मोठा मुलगा सागर पाटील याने सौदागर यांना हात पाय मोडण्याची धमकी दिलेली होती. त्यामुळे ते ही त्याचेवर डुख धरून होते. त्यांनी ही सागर पाटील याला माझ्या आडवे आलास तर तुला जिवंत ठेवीत नाही अशी धमकी दिलेली होती. त्यातच किसन पाटील यांची बायको सिंधू पाटील आणि मुलगा सागर हे दोघे जण आपल्या शेताकडे बैलगाडी घेऊन चालले असताना ते बांधावर आल्यावर त्यांना सौदागर यांनी अडविले. आपल्या बांधावरून बैलगाडी न्यायची नाही नेलीस तर तुझा मुडदा पाडतो असे सांगितले त्याचवेळी सौदागर यांनी पत्नी सोनाली आणि मुलगी निर्मला यांना बोलावून घेतले. त्या दोघी आल्यावर जोरात भांडणाला सुरूवात झाली. सोनाली आणि निर्मला यांनी सिंधु यांना बैलगाडीतून खाली उतरवून तिला मारहाण करायला सुरूवात केली तर सागर याना सौदागर पाटील हे मारहाण करू लागले. त्यावेळी सागर यांनी वडिल किसन आणि भाऊ नानासाहेब यांना शेतात येण्यास सांगून सौदागर आणि त्याच्या बायकोने आणि मुलीने आईला मारहाण करीत असल्याचे सांगितले. त्याने फोन केल्या केल्या किसन हे धावत पळत शेतात आले. त्यावेळी बायकांच्यात आणि सौदागर आणि किसन सागर यांचेत हाणामारी सुरू झाली. संध्याकाळी शेतात धुमचक्री सुरू झाली. कोण कोणाला मारहाण करीत आहे हे समजत नव्हते. बायका तर एकमेकींच्या झिंज्या ओढत एकमेकीला शिवीगाळ करीत मारहाण करीत होत्या. या दरम्यान रागाच्या भरात असणाऱ्या सौदागर पाटील यांनी सागरच्या पोटात आपल्या कडील चाकूने वार केला. तो ओरडत खाली पडत असताना सिंधू या मध्ये आल्या त्याचेवर ही सौदागर याने चाकूने वार केला. त्या दोघांच्या पोटात त्याने चाकू खुपसला. त्याचेवर वार होत असताना किसन पाटील हे आडवे आले. त्याच्यावर ही सौदागर याने चाकूने वार केले. तो वार त्याच्या डाव्या बोटावर बसला. त्याच्या तोंडावर आणि हातावर वर्मी घाव बसल्याने ते ही गंभीर जखमी झाले. शेतात आरडा ओरडा सुरू असताना तेथे किसन याचा मुलगा नानासाहेब हा आला. तोपर्यंत सौदागर आणि सोनाली निर्मला पाटील हे तेथून निघून गेले. सौदागर याने या घटनेत दोघांना मारले होते. दुहेरी खूनाची घटना घडली असल्याने भोयरे गावातील अनेकजण घटनास्थळी आले. बघता बघता लोकांची गर्दी तेथे वाढली. तोपर्यंत कुणी तरी या घटनेची माहिती बार्शी ग्रामीण पोलीसाना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळी श्वान पथकाला आणि ठसे तज्ञाना पाचारण केले. श्वान पथक हे घटनास्थळाच्या थोडसे पुढे जावून थांबले. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि यातील संशयीत आरोपी कोण आहेत याची माहिती पोलीसाना नानासाहेब पाटील याच्याकडून मिळाली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह बार्शी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेनंतर बार्शी ग्रामीण पोलीसात सौदागर पाटील हे स्वत:हून हजर झाला. त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना देवून आपला गुन्हा कबुल केला. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यानंतर या घटनेची फिर्याद नानासाहेब पाटील याचेकडून घेण्यात आली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सागर किसन पाटील (वय २६), सिंधु किसन पाटील (वय ५२) आणि किसन पाटील (वय ५८) याच्या खून प्रकरणी आणि किसन पाटील याचेवर खुनी हल्ला केल्याप्रकरणी सौदागर पाटील, त्याची पत्नी सोनाली पाटील आणि मुलगी निर्मला पाटील याच्या विरोधात भा.दं.वी. १०३(१) आणि इतर कलमाखाली गुन्हा दाखल करून त्यांना बार्शी येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्या तिघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी सौदागर पाटील याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास बार्शी ग्रामीण पोलीस करीत आहेत. जर जरा जमीन याचा वाद हा वेळेत मिटवला गेला नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## मोबाईल चोरीवरून दोघांत वाद ...

शहराला बिगर वेशीचे गाव म्हणून संबोधले जायचे. अलिकडे मात्र या शहरात बेलापूरकडून येणाऱ्या रस्त्यावर मोठी वेस उभारली आहे. शहराच्यामधून रेल्वे लाईन गेलेली असल्याने शहरात बाहेरून येणाऱ्या-जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. कमलेश पवार याच्यासारख्याच शहरातील बस स्टँड, रेल्वे स्टेशन बाजारपेठेत चोऱ्या-माऱ्या करणाऱ्या अनेक टोळ्या याठिकाणी कार्यरत आहेत. त्यातीलच एका टोळीचा म्होरक्या असलेला विजय उर्फ टम्या गुलाब अडांगळे (रा. कांदा मार्केटसमोर, वॉर्ड नं. ६) हा एक अट्टल चोर आहे. त्यांची एक टोळीच आहे. या टोळीत तौफिक आयुब पठाण (रा. हुसेननगर, वॉर्ड नं. १), बाबर जब्बार पठाण (रा. हुसेननगर, वॉर्ड नं. १) तसेच समीर पठाण व शुभम वाघमारे असे लोक कार्यरत आहेत. किरकोळ भुरट्या चोऱ्या करणे, लोकांच्या घरी चोऱ्या करणे हाच या टोळीचा उद्योग. चोऱ्या केल्याशिवाय या मंडळींना चैन पडत नसे. त्यात एकदा मात्र झाले ते उलटेच निघाले. टम्या अडांगळेच्या या टोळीतील एकाने कमलेश पवारच्या नातेवाईकाचा अर्थातच मेहुण्याचा मोबाईल चोरला. या घटनेची माहिती कमलेश पवारला होताच त्याची तळपायाच आग मस्तकात गेली. त्याने तात्काळ त्या टोळक्याला गाठले आणि आपल्या मेहुण्याचा मोबाईल परत मागितला, पण त्या टोळक्याने त्याला उडवाउडवीची उत्तरे देऊन परत पाठवले, तरीही कमलेशनेही पिच्छा सोडला नाही. त्याने वेळोवेळी त्याच्या मेहुण्याच्या मोबाईलची मागणी केली, परंतु टम्या अडांगळे हा काही बधायला तयार नव्हता. उलट तो कमलेशला शिवीगाळ करत असे. अशारितीने नातेवाईकाच्या मोबाईल चोरीवरून कमलेश पवार व टम्या अडांगळे या दोन टोळ्यांमध्ये संघर्ष सुरु झाला होता. कमलेश हा वेळोवेळी टम्या याला फोन करून मेहुण्याच्या मोबाईल हँडसेटची मागणी करायचा अन् टम्या त्याला शिवीगाळ करून दमदाटी करायचा. मोबाईल हँडसेट चोरीवरून दोन्ही टोळ्यांमध्ये चांगलाच संघर्ष पेटला होता. या दोन्ही टोळ्यांची श्रीरामपूर शहराला विशेषतः पोलीस खात्याला जादाच डोकेदुखी होती. मोबाईल चोरीवरून दोन्ही टोळ्यांमध्ये आगीची ठिणगी पडल्यामुळे आगडोंब उसळला. दोन्ही बाजूंनी शिवीगाळ व धमक्यांचा उच्चांक झाला. अन् एक दिवस जे व्हायचे तेच झाले. बुधवार दि. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास कमलेश पवार व त्याचा जोडीदार ज्ञानेश्वर बाळासाहेब हासे असे दोघे जण मोटरसायकलवरून श्रीरामपूर शहरातील आयकॉन कॉम्प्युटरच्या मागील साळुंके बिल्डींगच्या जवळील कॉलनीकडून जात असतांना विजय उर्फ टम्या अडांगळे, त्याचे दोन-तीन जोडीदार तौफिक आयुब पठाण, बाबर जब्बार पठाण, समीर पठाण, शुभम वाघमारे हे अचानक समोरून आले. त्यांनी आपल्या गाड्या कमलेश पवारच्या गाडीला आडव्या लावल्या. त्यावेळी टम्या अडांगळे मोठ्याने ओरडला. 'कौन, कमल्या है क्या?' तो असे म्हटल्यावर कमलेश त्याला हो म्हटला. तो असे म्हणताच ते सर्व जण कमलेश पवारवर तुटून पडले. त्यांनी सर्वांनी लोखंडी रॉड, पाईप तसेच चाकूने त्याच्यावर हल्ला केला. कमलेश पवारचा जोडीदार ज्ञानेश्वर हासे हा तेथून घाबरून पळून गेला. श्रीरामपूर शहरात रात्री १२.३० ते १ दरम्यान ही घटना घडल्याने कमलेश पवारचा जोडीदार ज्ञानेश्वर हासे पळत पळतच श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आला. त्याने ड्युटीवरील ठाणे अंमलदारांना घडलेली घटना सांगितली. ठाणे अंमलदारांनी तात्काळ रात्रीच्या वेळेस पेट्रोलिंग करत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना घटनेची माहिती दिली. पेट्रोलिंग गाडी घटनास्थळाकडे रवाना झाली. त्याचवेळेस ठाणे अंमलदारांनी पोलीस स्टेशनचे इन्चार्ज पोलीस निरीक्षक देशमुख यांच्या मोबाईलवर संपर्क करून या गंभीर घटनेची माहिती दिली. श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश आव्हाड, गणेश जाधव, उपनिरीक्षक समाधान सोळंके, रोहिदास ठोंबरे, दादाभाई मगरे, रोशन निकम, दिपक मेढे, शरद अहिरे, संभाजी खरात, अजित पटारे, अमोल पडोळे, अमोल गायकवाड, अंबादास आंधळे, रामेश्वर तरडे, सहाय्यक फौजदार राजेश सुर्यवंशी, बाळासाहेब गिरी, कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर वाघमोडे, महिला कॉन्स्टेबल मिरा सगर असा सर्व पोलीस स्टाफ घटनास्थळाकडे मध्यरात्री रवाना झाला. घटनास्थळी कमलेश पवार रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. पोलीस पथकाने घटनास्थळाचा पंचनामा करून पवारला ग्रामीण रूग्णालयात हलवले, मात्र शरीरावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने तो मयत झाला होता. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मयत घोषीत केले. श्रीरामपूर शहर पोलिसांनी विजय उर्फ टम्या गुलाब अडांगळे याच्यासह त्याच्या जोडीदारांविरूद्ध ज्ञानेश्वर बाळासाहेब हासे यांची फिर्याद घेवून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १०६९/२०२४ बी.एन.एस. २०२३ चे कलम १०३, १२६, ३२४ (४), ३५२, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला. या घटनेची माहिती जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, तसेच डी. वाय.एस.पी. डॉ. बसवराज शिवपुजे यांना देण्यात आली. डॉ. बसवराज शिवपुजे यांनी घटनास्थळास भेट दिली. जिल्हा पोलीस प्रमुखांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना संशयित आरोपींना तात्काळ अटक करण्याचे आदेश दिले. श्रीरामपूर शहर पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखेने कसून तपास करून यातील संशयित आरोपी टम्या अडांगळे, तौफिक पठाण, बाबर पठाण, समीर पठाण यांना जेरबंद केले. पाचवा संशयित आरोपी शुभम वाघमारे फरार आहेत.

## दागिन्याचा मोह प्राणावर बेतला...

अंगावरील सोने घेण्याकरिता किंवा अज्ञात कारणास्तव त्यांचे अपहरण केल्याची फिर्याद त्यांचा मुलगा विश्वजीत चामे याने मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार प्रभारी पोलीस निरीक्षक रणजीत माने यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा तपास सुरू होता. तपासा दरम्यान कृष्णा चामे यांच्या शेतात काम करणारा सचिन गिरी यांच्यावर पोलिसांचा संशय बळावला. याबाबत पोलिसांनी सचिन गिरी याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने पोलिसांना दिलेल्या कबुली जबाबमध्ये मालक कृष्णा चामे यांचा हातोड्याने मारहाण करून खून करून मृतदेहाचे चाकूने तुकडे करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने पुरून ठेवले असल्याचे सांगितले ते तुकडे पोलिसांना त्याने काढून दिले. मृत कृष्णा चामे यांच्या अंगावरील सोन्याचे दागिनेही त्यांनी काढून दिले अंगावरील सोने चोरी करण्याच्या उद्देशाने कृष्णा चामे यांचा खून केल्याप्रकरणी सचिन गिरी याच्यावर मोहोळ पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक रणजीत माने हे करीत आहेत. घटनेची माहिती मिळताच सोलापूर ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर आदींनी घटनास्थळी भेट दिली. संशयित आरोपी सचिन गिरी हा गेल्या दहा महिन्यापासून चामे यांच्याकडे सालगडी म्हणून काम करत होता. मालक कृष्णाचा मी यांच्या अंगावर असलेल्या सोन्याच्या लोभातून वस्तीवरील घरात घुसून घराच्या पाठीमागे असलेल्या शोष खड्ड्यात त्यांचा मृतदेहाचे तुकडे करून पुरले होते. पोलिसांच्या पथकाने या खून प्रकरणाचा तपास लावला सचिन गिरी याला खून प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

## विवाहित प्रेयसीला त्याने भयंकर ...

अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील पोलिस अपहरण झालेल्या विद्यार्थ्याचा शोध घेत होते. दरम्यान, १३ दिवसांनी गुंजाळवाडी गावच्या हद्दीतील एका विहिरीत सदर विद्यार्थ्याचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याचे शाळेचे ओळखपत्र देखील पोलिसांना विहिरीजवळ मिळून आले. दरम्यान, तरुणाचा मृतदेह आढळून आलेल्या ठिकाणी पोलिसांना चिठ्ठी मिळून आली. त्यात काहींची नावे असल्याची माहिती समोर आली आहे. अल्पवयीन मुलाचा विहिरीत आणि त्याच्या अपहरण प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या आरोपीचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यामुळे या दोन्ही घटनांचा तपास पारगाव कारखाना आणि संगमनेर शहर या दोन्ही पोलिसांनी संयुक्तरीत्या करून नेमका काय प्रकार घडला असावा? याचा शोध सुरू आहे.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच
पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर
प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या
शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

30 DECEMBER 2024 To 05 JANUARY 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 12/28/2024 8:33 PM Page 1



# परभणीतील सोमनाथ सूर्यवंशीच्या मारेकऱ्यांवर हत्येचा गुन्हा दाखल करावा –संजयभाऊ कांबळे



**लातूर/प्रतिनिधी**

बहुचर्चित परभणी घटनेतील मयत सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच झाला असून त्याच्या शवविच्छेदन अहवालानुसार त्यांच्या मारेकऱ्यांवर ३०२ चा गुन्हा दाखल करावा. त्याचप्रमाणे लोकनेते विजय वाकोडे यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याच्या मानसिक तणावातून त्यांचा मृत्यू झाला आहे. वाकोडे यांच्या मृत्यूसही पोलीसच जबाबदार असल्याचा आरोप भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केला. लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संजयभाऊ कांबळे पुढे म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्यानंतर विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या घरी जाऊन सांत्वन केले आहे. शवविच्छेदन अहवालात त्यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे झाल्याचा उल्लेख असतानाही अद्यापपर्यंत मारेकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. तसेच गुन्हा दाखल करण्याबाबत कोणीही पुढाकार घेतलेला नाही. त्यांच्या अंत्यविधीच्या दिवशी आंबेडकरी समाजाची गुन्हा दाखल करण्याची संतापजनक मागणी होती. परंतु संतापलेल्या समाजाला एड. बाळासाहेब आंबेडकर यांनी शांत राहण्याचे आवाहन केल्यामुळे आंबेडकरी समाज शांत राहिला. ही संधी पोलिसांना मिळाल्याने त्यांनी चक्क सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू श्वसनाच्या आजारामुळे झाल्याचा अहवाल तयार करून मुख्यमंत्र्यांकडे पाठविला. तो अहवाल विधिमंडळात वाचून दाखवून मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करणार असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणात विरोधी पक्ष, विविध राजकीय पक्षाचे नेते सांत्वनपर भेटी देऊन प्रकरणाचे राजकारण केले जात असल्याबद्दल कांबळे यांनी तीव्र शब्दात संताप व्यक्त केला.

सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या अमानुष मारहाणीमुळेच झाला असल्याने त्यांच्या मारेकऱ्यांवर तात्काळ ३०२चा गुन्हा दाखल करावा आणि त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून द्यावा. तसेच लोकनेते विजय वाकोडे यांच्यावर सुद्धा पोलिसांनी दंगलीचा खोटा गुन्हा दाखल केल्याने त्या मानसिक तणावातच त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या मृत्यूलाही पोलिसच जबाबदार आहेत. याबाबतही गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आपली मागणी आहे.

सध्या राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे गोरगरीब जनतेमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दुसरीकडे राज्यातील अंबाजोगाई, नांदेड, पुणेसह ११ जिल्ह्यांमध्ये बनावट औषधांचा पुरवठा ठेकेदारांमार्फत झाला असून सदर बनावट औषधांमुळे किती रुग्णांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे, याची भीती जनमानसात आहे. या प्रकरणाचीही सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही भारतीय दलित पँथरच्या वतीने करण्यात येत असल्याचे संजयभाऊ कांबळे यांनी सांगितले. केवळ पोलीस प्रशासनच नव्हे तर न्याय व्यवस्थेशी संबंधित असणारे न्यायाधीशही आता न्याय देण्यासाठी लाचेची मागणी करत असल्याचे सातारा येथील घटनेवरून दिसून आले. त्यामुळे सामान्यांनी आता दाद मागायची तरी कोणाकडे? असा गंभीर सवालही संजयभाऊ कांबळे यांनी उपस्थित केला. याप्रसंगी नामदेव बामणे, निवृत्ती भाटकुळे, धम्मानंद घोडके, संग्राम कदम, सतीश वाघमारे, नारायण गायकवाड, सतीश मादळे, गोविंद गायकवाड, राजीव कांबळे, इतिहास कांबळे, महेंद्र आचार्य, धम्मपाल सावंत,उत्तम कांबळे, हरिश्चन्द्र वाघमारे, सत्यवान जोगदंड, कैलास क्षीरसागर, विशाल कांबळे आदींची उपस्थिती होती.

## तीन आश्रम शाळांना अन्नपुरवठा करणाऱ्या वाहनांचा अपघात; विद्यार्थ्यांना वेळेवर अन्न मिळण्यास विलंब!



**डहाणू/प्रतिनिधी**

डहाणू आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चळणी, सायवन, दाभाडी किन्हवली या आश्रमशाळांना अन्नपुरवठा करणाऱ्या वाहनाचा कासा पोलीस ठाणे हद्दीत बापूगाव जवळ अपघात झाल्याची घटना घडली आहे. एका भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनाने अन्नपुरवठा करणाऱ्या गाडीला एका बाजूने दाबल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याने ती पलटी झाल्याची माहिती चालक व स्थानिक ग्रामस्थांनी दिली आहे.या अपघातात कोणतीही जीवीतहानी झालेली नाही. या वाहनात तीन आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी संध्याकाळच्या जेवणाचे डबे वाहून नेले जातात. मात्र, सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या अपघातामुळे अन्न पुरवठा भरलेले डबे रस्त्यावर विखुरले. यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर अन्न मिळण्यास विलंब झाला. या घटनेनंतर तत्काळ पर्यायी गाडी पाठवून अन्नपुरवठा करण्यात आल्याची माहिती डहाणू प्रकल्प अधिकारी सत्यम गांधी यांनी दिली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांनी संताप व्यक्त केला आहे. पालकांनी सांगितले की, काही वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांना गरमागरम अन्न शाळांमध्येच तयार करून दिले जात होते. मात्र, सध्या एका खासगी कंपनीमार्फत अन्न तयार करून ४०-५० किलोमीटर दूरवरून शाळांमध्ये पोहोचवले जात असल्याने ते थंड आणि शिळे होत असल्याचा आरोप केला जात आहे.

या भागातील रस्त्यांवर सर्रासपणे अवजड अवैध वाहतूक होत असल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे. अशा घटनांमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणाचा तपास कासा पोलीस ठाणे करत असून, पुढील कारवाई सुरू असल्याचे समजते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शाळांमध्येच स्वयंपाकाची पूर्वीप्रमाणे सोय करावी, जेणेकरून यासारखे अपघात आणि पावसाळ्यात पूर आपत्ती निर्माण होणाऱ्या अडचणींमुळे विद्यार्थ्यांना उपाशी राहावे लागते, तशी परिस्थिती उद्भवणार नाही, असे पालकांनी सांगितले.

## अबिटघर ग्रामपंचायत येथे पेसा दिन उत्साहात साजरा



**वाडा/प्रतिनिधि**

केंद्र सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने निर्गमित केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मार्गदशित केल्याप्रमाणे मंगळवारी (दि. २४) आबिटघर ग्रामपंचायत कार्यालय येथे पेसा दिन जल्लोषात साजरा केला गेला या वेळी ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी साठे यांच्या शुभहस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमे सोबतच पेसाच्या मार्गदर्शक पुस्तकांचे पूजन करण्यात आले. पेसा कायद्यामुळे सर्वसामान्य लोकांना आपले हक्क आणि अधिकार कळाले.ते आत्मसात करून त्यांना स्वतः सोबतच समाजाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रगतीचा मार्ग सोपा करण्यासाठी बळ मिळाले.एका अर्थाने आमचा गाव आमचे सरकार ही संकल्पना खऱ्या अर्थाने पेसा कायद्याच्या अंमलबजावणी मुळे पूर्णत्वास गेली असे उद्गार पेसा समितीचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत आबिटघरचे ज्येष्ठ सदस्य भरत जाधव यांनी आपल्या मनोगता वेळी काढले. *ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक संजय पाटील व ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग यांच्या आयोजनातून पार पडलेल्या या विशेष कार्यक्रमावेळी आबिटघर सरपंच साक्षी साठे,उपसरपंच सुप्रिया पाटील, सदस्य कल्याणी साठे, सुरेश बोचल, विविध पेसा गावचे सदस्य अजय मोर सचिन दळवी, जान्हवी मोर, सारिका बोचल, युवा कार्यकर्ते दयानंद पाटील व माध्यमिक विद्यालय आबिटघर येथील विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रसिद्ध लेखक, कवी प्रशांत मोरे यांचे 'आई' या विषयावर पी.जे.हायस्कुल येथे व्याख्यान संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील पी.जे. हायस्कूल व आनंद लक्ष्मण चंदावरकर कनिष्ठ महाविद्यालयातील खुल्या रंगमंचावर पहाटेच्या सुमारास महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक, कवी व व्याख्यानकार प्रशांत मोरे यांचे 'आई' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कवी प्रशांत मोरे हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक असून ते गीतकार व कवी सुद्धा आहेत. ते आंबेडकरी विचारवंत म्हणून सुद्धा ओळखले जातात. प्रशांत मोरे यांचे तीन कविता संग्रह प्रसिद्ध असून त्यांचा आई या विषयावरील कवितांचं पुस्तकही प्रसिद्ध झालेल आहे.

कवी प्रशांत मोरे हे सर्वसामान्य माणसाच्या सुख दुःखावर, गरिबी, दारिद्र्य कुटुंब व्यवस्था यावर कविता लिहितात त्याच प्रमाणे ते त्यांच्या गोड व पहाडी आवाजात त्या सादरही करतात .त्यांच्या कविता या थेट माणसाच्या काळजाला घाव घालतात. आजच्या विद्यार्थ्यांना आपल्या आई-वडिलांचे महत्त्व, गुरुजनांचे महत्त्व काय आहे याची जाणीव व्हावी. तसेच शाळेतली व कॉलेज मधील तरुण-तरुणी आधुनिकतेच्या नावावर मोबाईल व सोशल मीडियाच्या जाळ्यात कसे ओढले गेले आहेत. त्यांना त्यांची ध्येय, उद्दिष्ट कसे प्राप्त करायचे. आपल्या मुलांसाठी आई-वडील कोणते त्याग करतात याची जाणीव व्हावी हा उद्देश डोळ्या समोर ठेवून वाडा को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सर्व सन्माननीय संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व स्कूल कमिटी चेअरमन यांच्या परवानगी ने कॉलेजचे प्राचार्य हरिश्चंद्र जोगी, उपप्राचार्य गोस्वामी सर, पर्यवेक्षक तांबोळी सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने मोरे सरांचे इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी साठी आई व्याख्यान आयोजित केले होते. मोरे यांनी आई वरील कविता सुंदर पहाडी व विदर्भ मराठवाड्याच्या वऱ्हाडी भाषेत गाऊन उपस्थित विद्यार्थी, पालक, शिक्षक यांचे मन भरून आणून प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू उभे केले.प्रत्येकाला आपल्या डोळ्यासमोर आईच दिसली. त्याचप्रमाणे बाप या विषयावर ही सुंदर कविता त्यांनी सादर केल्या. तसेच मोरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आई- वडील- गुरुजन आपल्या मुलां साठी कशा प्रकारे त्याग करतात. कोणत्या परिस्थितीत जीवन जगतात याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकणे सर यांनी केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य हरिश्चंद्र जोगी यांनी मोरे यांची ओळख व जीवन परिचय करून दिला. या कार्यक्रमासाठी कार्यालय अधीक्षक चंद्रकांत खिरारी व डॉ. अँड. सुनील भडांगे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार सोनवणे यांनी सुंदर कविता सादर करून उपस्थित सर्व पाहुण्यांचे व उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे सुंदर अलंकारिक शब्दात आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## डोंगस्ते येथील खदाणीमुळे गावातील घरांना तडे; ब्लास्टिंग बंद करण्याची ग्रामस्थांची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोंगस्ते हद्दीमध्ये दगडखदान, क्रशर व्यवसाय सुरू असून, सदर व्यवसायिकांकडून सातत्याने दिवसरात्र बोअर ब्लास्टींग केली जात आहे; परिणामी येथील ग्रामस्थांच्या घरांच्या भिंतींना तडे जावुन घरे कमकुवत झाली आहेत; त्यामुळे भविष्यात या ठिकाणी जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या संदर्भात ग्रामस्थांनी धर्मवीर विचार मंचाकडे न्याय मिळवुन देण्याची मागणी केली असता, धर्मवीर विचार मंचच्या वतिने तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. त्यासंदर्भात धर्मवीर विचार मंचचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, सदर ठिकाणची परिस्थिती अत्यंत गंभीर असून, केव्हाही जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता आहे. या प्रकारणी तहसीलदार, तलाठी यांनी मौजे-डोंगस्ते, विजयगड येथील संबंधित नुकसानग्रस्त घरांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून क्षतीग्रस्तांना तात्काळ नुकसान भरपाई मिळवुन द्यावी व संबंधित क्रशर चालकांकडून सुरू असलेली बोअर ब्लास्टींग त्वरीत बंद करण्यात यावी. शासकीय यंत्रणेने सदर प्रकरणी येत्या सात दिवसांच्या आत योग्य ती कारवाई नाही केली तर धर्मवीर विचार मंचच्या वतीने कुठल्याही प्रकारची पुर्वसूचना न देता वाडा तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले असा इशारा दिला असल्याची माहिती अध्यक्ष मिलिंद पष्टे यांनी दिली आहे.

## वाहनच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**वाडा/प्रतिनिधी**

हळदी समारंभा उरकून घराकडे चालत येत असलेल्या इसमाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्यांचा उपचारा दरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला आहे. नुसारवाडा तालुक्यातील मानिवली गावचे रहिवासी रामचंद्र शिडू माळी (५३) हे बुधरपाडा येथे हळदी समारंभासाठी गेले होते. तेथून आपल्या राहत्या घरी मानिवली येथे चालत येत असताना. ते रात्री ९ वाजताच्या सुमारास मानिवली येथील पशु वैद्यकीय दवाखान्या समोर आले असता कोणत्या तरी अज्ञात वाहणाने धडक दिल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांना तात्काळ वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला असल्याचे समजले. अज्ञात वाहन धारका विरोधात वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया मांढरे करत आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर**
**ई-निविदा सूचना क्र. १६/उविकृअपा/२०२४-२५**

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० अंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम सन २०२४-२५ मधील पालघर जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कामे करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर जि. पालघर कार्यालयामार्फत महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून नोंदणीकृत ठेकेदाराकडून खालील मृद संधारणच्या क्षेत्र कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा बाबतची कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पालघर यांनी राखून ठेवला आहे. निविदे मधील समाविष्ट कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा क्र. | गावाचे व तालुक्याचे नाव | कामाचे नाव व गट क्र. | निविदेची अंदाजित रक्कम (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (दिवस) | निविदा फी (रू) | इसारा रक्कम (रु.) | कोरे निविदासंच विक्रीसाठी उपलब्ध कालवधी व वेळ | निविदा उघडणे दिनांक व वेळ | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ३४ | गाव - विराथन बु. + शिरस्ते ता. पालघर जि. पालघर | मौजे- शिरस्ते/ विराथन बु. मजगी - गट क्र. १९ ते २५ व जुभाशेदु - गट क्र. ४१ ते ५० | १६८५१६४ | ३० | ५९० | १६८५२ | ०३/०१/२०२५ ते १७/०१/२०२५ वेळ १७.०० पर्यंत | २०/०१/२०२५ वेळ ११.०० पासून | १ ते ६ | निविदा प्रक्रियेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार भाग घेवू शकतील (खुला) |
| २. | ३५ | गाव - विराथन बु. + शिरस्ते ता. पालघर जि. पालघर | मौजे - शिरस्ते / विराथन बु. मजगी - गट क्र. १० ते १८ व जुभाशेदु - गट क्र. २८ ते ४० | १७०९२७६ | ३० | ५९० | १७०९३ | ०३/०१/२०२५ ते १७/०१/२०२५ वेळ १७.०० पर्यंत | २०/०१/२०२५ वेळ ११.०० पासून | १ ते ६ | निविदा प्रक्रियेत फक्त पालघर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता भाग घेवू शकतील. |
| ३. | ३६ | गाव-माकणे + कांद्रेभुरे ता. पालघर, जि. पालघर | मौजे - माकणे/ कांद्रेभुरे - जुभाशेदु - गट क्र. ३३ ते ४९ व मजगी - गट क्र. ०७ ते ११ | ९१४४१९ | ३० | ५९० | ९१४४ | ०३/०१/२०२५ ते १७/०१/२०२५ वेळ १७.०० पर्यंत | २०/०१/२०२५ वेळ ११.०० पासून | १ ते ६ | |

**ई-निविदेबाबत खालीलप्रमाणे अटी व शर्ती निविदाधारकांस बंधनकारक राहतील :-**

१. संचालक कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील ई-निविदा मार्गदर्शक सुचना दि. ०६ एप्रिल २०२३ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून ई-निविदा सादर करावी.
२. मा.कृषि आयुक्त पुणे यांचेकडील शुद्धीपत्रक दि. २६ ऑगस्ट २०२४ नुसार जिओ टॅग बाबत असलेल्या मुद्दा क्र. ११ व त्याचे संदर्भातील इतर सर्व तरतुदी रद्द करण्यात येत आहेत.
३. ई-निविदे बाबतचे शुद्धीपत्रक, दुरुस्त्या आवश्यक असल्यास उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर यांचेमार्फत संकेतस्थळावर करण्यात येतील.
४. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० मार्गदर्शक सूचना बंधनकारक राहतील.
५. भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीनुसार कार्यारंभ आदेशाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
६. ठेकेदाराने अटी व शर्ती असलेली निविदा सादर केल्यास ती स्वीकारली जाणार नाही.

सही/-
उपविभागीय कृषि अधिकारी,
पालघर, जि. पालघर

जिमाका/पालघर/ जाहि १५२/५५७/२०२४ दिनांक : २७/१२/२०२४

30 DECEMBER 2024 To 05 JANUARY 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 12/28/2024 8:33 PM Page 1



# वाल्मिकीचा वाल्या 'बीड'वासियांच्या संवेदना मेल्या!

सरपंच संपत देशमुख यांच्या हत्येनंतर, महाराष्ट्रातील जनतेच्या समोर जे काही आले आहे ते इतकं भयानक आहे की, खरोखरच माझा महाराष्ट्र पूर्णपणे गुन्हेगारांच्या हातात केला आहे का? असा प्रश्न पडतो. आणि कुठल्याही प्रकारच्या गुन्हेगारीला राजकीय आश्रय असल्याशिवाय गुन्हेगार मोकाट फिरत नाही. बीडमध्ये सुद्धा तेच घडलेले आहे. पवनचक्कीवाल्यांकडून खंडणी मागणाऱ्यांमध्ये कुठल्याही एकाच पक्षाचे लोक नाहीत, सर्व पक्षातले गुन्हेगार आहेत. परंतु यामध्ये सर्वात मोठा गुन्हेगार कोण आणि त्याची दहशत किती? यावरच बीडचे सर्व राजकारण अवलंबून आहे. मराठवाड्यातील बीड हा स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे यांचा बालेकिल्ला! सर्वच दृष्टीने मागासलेल्या या जिल्ह्याचा बऱ्यापैकी कायापालट करण्याचा प्रयत्न गोपीनाथ मुंडे आणि इतर नेत्यांनी केला होता. त्यात त्यांना थोडेफार यश आले. परंतु दुर्दैवाने राजकीय पुढाऱ्यांनी गुन्हेगारी स्वरूपाच्या लोकांना जवळ केल्याने, बीडचा अक्षरशा बिहार झाला आहे. मस्सा जोगचे सरपंच देशमुख यांनी वाल्मिकी कराडला विरोध केला म्हणून त्यांची अत्यंत अमानुषपणे हत्या करण्यात आली. या हत्येचा तपास सध्या सीआयडी कडे आहे. तरीसुद्धा वाल्मिकी कराड सापडलेला नाही. याचे मुख्य कारण वाल्मिकी कराडचे मायबाप महायुती सरकारमध्ये मोठ्या पदावर बसलेले आहेत. त्यामुळे वाल्मिकीला कितीही शोधा तो त्याच वेळेला सापडेल, जेव्हा त्याच्या सतेतल्या गॉडफादर नेत्यांना वाटेल की आता हे प्रकरण शांत झाले आहे. पण जर वाल्मिकी कराड मुळे आपण अडचणीत येऊ असे सतेतल्या त्याच्या गॉडफादर लोकांना ज्या दिवशी वाटेल, त्या दिवशी वाल्मिकी कराड आणि त्याच्या सोबत फरार असलेले तिघांचे एन्काऊंटर झालेले असेल. आश्चर्याची गोष्ट म्हणजे येवढे सर्व घडूनही मुख्यमंत्री फडणवीस, सरपंच हत्या प्रकरणात वाल्मिकी कराडचे नाव घ्यायला तयार नाहीत. याचा अर्थ काय? फडणवीस म्हणत आहेत की वाल्मिकी फक्त खंडणी प्रकरणात आरोपी आहे. म्हणजे अप्रत्यक्षरीत्या वाल्मिकीच्या मुख्यमंत्र्यांनी क्लिनचीट दिली आहे. बीडमध्ये राजकीय पक्षाच्या काही वासेपूर गेंग सक्रिय आहेत. आणि त्या गँग मधील लोकांकडे विनापरवाना शस्त्रे आहेत. बीडमध्ये गुन्हे दाखल असलेल्या जवळपास साडेतीन हजार गुन्हेगारांकडे बेकायदा शस्त्रे आहेत. त्यांना दिलेला शस्त्र परवाना वैद्य आहे का? शस्त्रे त्यांना कोणी दिली का दिली? याची बीड मधील कुठल्याही पक्षाच्या पुढाऱ्यांनी चौकशी केली नाही. की त्यांना तसे वाटलेही नाही. पण आता मात्र सरपंच देशमुखच्या हत्येनंतर बीड मधले काही वाल्या वाल्मिकी बनून बीडच्या गुन्हेगारीचा पाडा वाचत आहेत.मग इतकी वर्ष बीडच्या राजकारणात आणि सत्तेत राहून ते काय उपटत होते. त्यांना जर हे सर्व ठाऊक होत, तर यापूर्वी मीडिया समोर येऊन त्यांनी तोंड का नाही उघडल? जे आज बीड मधील गुन्हेगारी विषयी बोलत आहेत ते सुधा गुन्हेगारांचे साथीदार आहेत. त्यांचाही क्राईम रेकॉर्ड तपासायला हवा. वाल्मिकी कराड सारखे लोक पद्री पाळूनच त्यांनी बीडच्या राजकारणात आपला जम बसवला आणि आता त्यांचे राजकीय विरोधक अडचणीत येताच मीडिया समोर येवून पोपटा सारखे बोलू लागले. त्यामुळे या क्रिमिनल पोपटा वरही कारवाई व्हायला हवी. वाल्मिकी कराडवर खुनाचे २० तर खंडणी, बलात्कार, विनयभंग, हत्येचा प्रयत्न यासारख्या गंभीर गुन्ह्यात सुधा वाल्मिकीचे नाव आहे. एरव्ही चोरी किंवा मारमारीच्या प्रकरणात जरी एखादा माणूस वॉन्टेड असला, तर पोलीस वाले त्याच्या घरच्यांना त्रास देतात. पोलीस ठाण्यात आणून छळ करतात. पण देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिकी कराडच्या बायकोची आणि अंगरक्षकाची केवळ चौकशी झाली. पण बीड मधील त्याच्या साथीदारांच काय? त्यांना पोलिसांनी का नाही उचलले? अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि वाल्मिकी कराडचे लांगोटी यार धनंजय मुंडे यांची का नाही चौकशी केली? जो माणूस स्वतः सांगतो वाल्मिकी माझा सहकारी आहे मग वाल्मिकी कुठे आहे ते त्याला ठाऊक असणार. त्याला उचला तो सांगेल. पण तो आज सत्तेमध्ये आहे. म्हणून त्यांना कोणी हात लावत नाही. की फडणवीस त्याला मंत्रिमंडळातून हाकलायला तयार नाहीत. याचा अर्थ देशमुख याचा अर्थ बीड मधील आरोपींना महायुती सरकारचाही पाठिंबा आहे. असे असेल तर बीड मधील गुन्हेगारी कशी आणि कोण थांबवणार याचे उत्तर सरकारने द्यावे. रहाता राहिला सवाल बीडच्या जनतेचा, तर राजकीय पक्षांनी पाळलेल्या गुंडा कडून गुन्हेगारीचा हैदोस सुरू असताना, बीडची जनता संवेदना हीन होऊन गप्प बसली होती. जिल्ह्याचे नाव खराब होत असताना लोक हतबल होते. लोक तरी काय करणार? कोणाकडे तक्रार करणार? कारण पोलीस राज्यकर्ते आणि वाल्मिकी कराड सारखे गुंड हातात हात घालून काम करीत होते. ज्यांनी आवाज उठवला त्याचा आवाज दाबला गेला. केवळ बीड मधेच नाही तर राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्यापासून संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र बदलले आहे. अशा वेळी महाराष्ट्राचा सीरिया व्हायला फार वेळ लागणार नाही.

### आरोग्य विद्यापीठाच्या 'कुलगुरु कट्टा' उपक्रमात कुलगुरु यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

# 'कौशल्य शिक्षणाला विद्यार्थ्यांनी अधिक प्राधान्य देणे गरजेचे'

## कुलगुरु लेफ्ट.जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांचे प्रतिपादन



**लातूर/प्रतिनिधी**

शैक्षणिक गुणवत्ता टिकविण्यासाठी कौशल्य शिक्षणाला विद्यार्थ्यांनी अधिक प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मा. विद्यापीठाच्या मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) प.वि.से.प., अ.वि.से.प., वि.से.प यांनी केले. विद्यापीठाचे संलग्नित महाविद्यालयातील विविध विद्याशाखांचे विद्यार्थ्याकरीता विद्यापीठातर्फे 'कुलगुरु कट्टा' कार्यक्रमाचे लातूर येथील विभागीय केंद्रात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) होत्या सवमेत मा. प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, लातूरचे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, उपकुलसचिव डॉ. सुनिल फुगारे, लातूर विभागीय केंद्राचे समन्वयक डॉ. संतोषकुमार डोपे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील व्यासपीठावर उपस्थित होते तसेच परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू दुरस्थ पध्दतीने उपस्थित होते.

विद्यापीठाचे मा. कुलगुरु लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधल्याने त्यांच्या अडचणी समजून त्वरीत अंमलबजावणी करणे शक्य होते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी 'थिंकिंग बियाँड' चा अवलंब करावा. संशोधन हा शिक्षणाचा गाभा समजून अभ्यास करावा. गुणांकणापेक्षा जिज्ञासू वृत्ती वाढवून क्षमता बळकट कराव्यात. सर्व विद्याशाखांचा सर्वांगिण विकास होणे गरजेचे आहे यासाठी विद्यापीठाकडून विविध उपक्रम रावबविण्यात येतात त्याचा विद्यार्थ्यांनी उपयोग करुन घ्यावा.

त्या पुढे म्हणाल्या की, केंद्र शासनाच्या विकसित भारत उपक्रमात युथ इंडिया करीता विद्यार्थ्यांनी संशोधन विषयक संकल्पना मांडल्या त्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी महाविद्यालयांनी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी मॉडयुल तयार करुन त्याचा अवलंब करावा. विद्यापीठाने डिजिटल हेल्थ इंडियाच्या माध्यमातून ई-प्रबोधिनी अंतर्गत ऑनलाईन कोर्स सुरु केले आहेत हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपयुक्त आहेत. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर अवांतर वाचन, धावणे, पोहणे, संगीत आदी कला प्रकारात वीस टक्के वेळ घालवावा जेणेकरुन आपले मानसिक संतुलन ठीक राहण्यास मदत होते. आपले मन आणि शरिर यांचा अंतरिक संबंध असतो त्याची कनेक्टीव्हिटी कायम ठेवा असे त्यांनी सांगितले. विद्यापीठाचे मा. प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ यांनी सांगितले की, 'शासनाचा शासन आपल्या दारी' उपक्रमाच्या संकल्पनेनुसार विद्यापीठ आपल्या दारीच्या माध्यमातून मा. कुलगुरु महोदया यांनी राज्यातील प्रत्येक प्रशासकीय विभागात कुलगुरु कट्टाचे आयोजन करण्यात येत आहे. समस्यांवर उपाय शोधण्यासाठी महत्वाकांक्षी असावे. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक दृढ होण्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी विद्यापीठ प्रशासन तत्पर आहे. विद्यार्थ्यांकडून येणारे प्रश्नांवर उपाययोजना शोधणे महत्वपूर्ण आहे यासाठी कुलगुरु कट्टयाच्या माध्यमातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी समजून निराकरण करण्यासाठी ठोस प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अनेक अडचणी असतात त्याबाबत त्यांनी स्थनिक चौकशीत योग्य माहिती दिल्यास विद्यापीठाकडून योग्य कार्यवाही करणे सुलभ होते त्यासाठी विद्यार्थ्यांनी योग्य माहिती देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरवातील विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन विषयावर मानसोपचार तज्ज्ञ श्रीमती मानसी हिरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील यांनी केले. पर्यावरण संवर्धनाचा जागर करण्याच्या हेतूने कार्यक्रमाच्या प्रारंभी मा. कुलगुरु रोपटयाला जलार्पण करण्यात आले. इंद्रधनुष्य २०२४ पाश्चिमात्य वाद्यसंगीतात या कलाप्रकारात तृतीय पारितोषिक विजेता देवेश देशपांडे यांचा मा. कुलगुरु महोदया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनंसपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ.देवेंद्र पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास मांजरा आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आनंद पवार, लातूरचे एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. जावेद सिद्दीकी, धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय पाटील, डॉ. स्नेहल सांगळे, डॉ. रत्नेश्वर धानुरे आदी मान्यवर उपस्थित होते. वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता बाळासाहेब पेंढारकर, डॉ. विमल होळंबे श्रीधर उरगुंडे, कृष्णा भुते, अरुण वाघमारे, अभिजित साबळे, उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अविनाश सोनवणे, नीलेश ओहोळ अर्जुन नागलोथ, श्रीमती अर्चना निकम, पुष्कर तऱ्हाळ, विनायक ढोले, रोहित भोये, सोहम वानेरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एकशे पन्नास पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता.

# २६ तोळे सोने लूटीचा बनवा करणाऱ्या सराफ व्यापाऱ्याला अटक

**लातूर/प्रतिनिधी**

डोळ्यात मिरची पूड टाकून २६ तोळे सोन्याचे दागिने लुटीचा बनाव रचणाऱ्या सराफ व्यापाराचा परदाफाश करत स्थानिक गुन्हे शाखा व लातूर ग्रामीण पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. याप्रकरणी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात भामट्या सराफ व्यापारा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, दिनांक २३/१२/२०२४ रोजी सायंकाळी सात वाजण्याचे सुमारास लातूर येथील सराफा व्यापारी अमर अंबादास साळुंके, वय ३१ वर्ष, राहणार पोचम्मा गल्ली ,लातूर यांनी पोलीस ठाणे लातूर ग्रामीण येथे तक्रार केली की, दिनांक २३/१२/२०२४ रोजी सायंकाळी सराफ लाईन, लातूर येथील एका दुकानातून २० लाख ४६ हजार रुपये किमतीचे २६ तोळे सोन्याचे दागिने त्याचे स्कुटी गाडीच्या डिक्की मध्ये घेऊन नेहमीप्रमाणे गिर्हाईकांना दाखविण्यासाठी रेनापुर येथे गेलो होतो. तेथून परत येत असताना सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास रेनापुर ते लातूर जाणारे रोडवरील कातळे नगर,जवळ मोटर सायकल वरून आलेल्या दोन अज्ञान व्यक्तीने माझ्या डोळ्यात मिरची पूड टाकून माझ्या




गाडीतील २६ तोळे सोन्याचे दागिने चोरून घेऊन पळून गेले आहेत अशी तक्रार केली. सदर तक्रारीचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे सूचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर ग्रामीण बि.चंद्रकांत रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे लातूर ग्रामीणचे अधिकारी अमलदारांचे पथके तयार करून मार्गदर्शन करून तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आले. सदर पथकांनी तात्काळ घटनास्थळावर पोहोचून घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. तसेच तक्रारदार अमर अंबादास साळुंके याचे कडे कुशलतेने विचारपूस केली. घडलेली घटना व अमर साळुंके सांगत असलेल्या हकीकत मध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती दिसून येत होत्या. त्यावरून पथकाने अमर साळुंके यास विश्वासात घेऊन विचारपूस केली तेव्हा त्याने सांगितले की, मला लोकांचे पैसे देणे झाल्याने सदरचे दागिने चोरी गेल्याचा बनाव करून त्यामधून माझा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी चोरीचा बनाव केल्याचे कबूल केले. तसेच त्याने रेणापूर ते लातूर कडे येणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या एका शेतामध्ये खड्डा करून लपवून ठेवलेले २० लाख ४६ हजार रुपयांचे २६ तोळ्याचे दागिने काढून दिल्याने ते पोलिसांनी हस्तगत केले आहे. डोळ्यात मिरची पूड घालून सोन्याचे दागिने लुटीचा बनाव करून पोलिसांना खोटी तक्रार दिल्याच्या कारणावरून अमर अंबादास साळुंके, वय ३१ वर्ष, (सोने चांदीचे व्यापारी) राहणार पोचमा गल्ली, लातूर याचे विरुद्ध पोलीस ठाणे लातूर ग्रामीणचे ठाणे अंमलदार लक्ष्मण धर्माजी कुंभरे त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वरिष्ठांचे मार्गदर्शनात पथकांनी अतिशय कुशलतेने सदर घटनेचा तपास करून सदरची घटना ही खोटी असून बनवाबनवी केल्याचे निष्पन्न करून तक्रारदारा कडूनच २० लाख ४६ हजार रुपयांचे २६ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे व उपविभागीय पोलीस अधिकारी, चाकूर चार्ज लातूर ग्रामीण बी. चंद्रकांत रेड्डी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, पोलीस अंमलदार मोहन सुरवसे, प्रदीप स्वामी,नितीन कठारे, मनोज खोसे, सचिन मुंडे, तसेच पोलीस ठाणे लातूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार, पोलीस उपनिरीक्षक मोरे, पोलीस अंमलदार चौगुले, चंद्रपाटले, दरोडे यांनी केली आहे.

# तळीरामांना उठाबश्यांचा धडे गांजा व्यसनी, मद्यधुंदांविरुध्द पोलीस उपायुक्तांची मोहीम



**कल्याण/प्रतिनिधी**

कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी आता पोलीस उपायुक्त अतुल झेंडे स्वता रात्रीच्या वेळेत रस्त्यावर उतरले आहेत. गांजा, अंमली पदार्थ सेवन, मद्याचे अड्डे शोधून काढून तेथे विक्री करणाऱ्या आणि सेवन करणाऱ्या अशा दोघांना घटनास्थळी पकडून त्यांची कानउघडणी करून, त्यांना वर्दीचा दणका देऊन त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जात आहे. कल्याण पूर्वेत बुधवारी रात्री दहा गांजा सेवन करणाऱ्यांना कोळसेवाडी पोलिसांनी पकडले होते. त्यांची कानउघडणी करून त्यांना १०० उठाबशा काढण्याची शिक्षा करून नंतर सोडण्यात आले. पुन्हा उघड्यावर कोठे गांजा किंवा अंमली पदार्थ सेवन करताना आढळले तर अटकेची कारवाईची तंबी या तळीरामांना देण्यात आली. गुरुवारी रात्री खडेगोळवली भागात आठ जणांना उघड्यावर गांजा सेवन करणाऱ्या तळीरामांना पकडण्यात आले. त्यांची 'हजेरी' उपायुक्त झेंडे यांनी घेतली. उपायुक्तांच्या आक्रमक पवित्र्यामुळे स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकारी, पोलीस कृतीशील झाले आहेत. मागील चार वर्ष वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा आक्रमक दणका कल्याण, डोंबिवलीतील मद्यधुंद, तळीराम, गांजा सेवन करणाऱ्यांना पाहण्यास मिळाला नव्हता. त्याची चुणूक आता उपायुक्त झेंडे यांनी दाखविण्यास सुरूवात केली आहे. या कारवाईमुळे रात्री नऊ वाजल्यापासून ते पहाटे चार वाजेपर्यंत कल्याण, डोंबिवली शहराच्या विविध भागात गांजा सेवन करणाऱ्या टवाळखोरांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. कल्याण पूर्वेतील खडेगोळवली भागात एका निर्जन ठिकाणी आठ टवाळखोर अंमली पदार्थ, मद्य सेवन करत असल्याची माहिती उपायुक्त झेंडे यांना मिळाली. या सर्वांना पकडून पोलिसांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात हजर केले. या सर्वांची कानउघडी करत, वर्दीचा दणका दाखवत, त्यांना १०० उठाबशा काढण्याची शिक्षा देण्यात आली. उठाबशा काढताना अनेक जण कण्हत कुथत होते. हा प्रकार परिसरातील नागरिक हास्य करत पाहत होते. उपायुक्तांच्या दणक्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करत आहे. उपायुक्तांनी एकदा डोंबिवली खाडी किनारी फेरफटका मारण्याची मागणी नागरिक करत आहेत. नवीन वर्षानिमित्त रस्तोरस्ती मद्यधुंद मद्यपी, टवाळखोर, गर्दुल्ले नागरिकांना त्रास देण्याची शक्यता विचारात घेऊन, तसेच कल्याण परिसरातील वाढती गुन्हेगारी विचारात घेऊन उपायुक्तांनी टवाळखोरांविरुध्द मोहीम उघडली आहे.कल्याण परिसरातील लैंगिक अत्याचाराच्या घटना विचारात घेऊन आठ पोलीस ठाणे हद्दीत एकही मद्यधुंद मद्यपी, टवाळखोर, तळीराम रस्त्यावर दिसणार नाही. नागरिकांना त्यांचा त्रास होणार नाही. त्यांचे अड्डे कुठेही दिसता कामा नयेत. असे कोणी भेटले त्याला तेथेच पकडून कारवाई करण्याच्या सूचना पोलीस ठाण्यांना केल्या आहेत, असे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

# विरार येथे साहित्य चावडीवर उलगडला प्रभू येशूचा जीवनपट

**विरार/प्रतिनिधी**




भारतासह संपूर्ण जगभरात नाताळचा सण मोठ्या उत्साहात साजरा जातो. नाताळ सणाचे औचित्य साधून मंगलमुर्ती मंदिर वाय के नगर विरार पश्चिम येथे साहित्य चावडीवर प्रभू येशूचा जीवनपट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते साहित्य चावडीचे ६४ वे पुष्प असलेल्या या कार्यक्रमाचे सरपंच कवी एमेल जोसेफ आल्मेडा यांनी संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाकरीता प्रभू येशू यांनी बलिदान दिले त्या प्रभू येशू यांच्या विषयीचा संपूर्ण जीवनपट उलगडून दाखविला.. एमेल जोसेफ आल्मेडा यांनी नाताळ विषयी संपूर्ण माहिती सांगून हा सण कशाप्रकारे साजरा केल्या जातो. त्या विषयी संपूर्ण पार्श्वभूमी सांगितली . कोणताही जातीभेद धर्मभेद न पाळता सर्वच सण एकत्रित साजरे करावे नाताळ हा एकात्मतेचा सण आहे असे सांगून साहित्यावर आधारित विविध कार्यक्रम राबवित असलेल्या साहित्य चावडीचे कौतुक केले. ही एक चळवळ आहे वेगवेगळ्या ठिकाणी चावडीचे कार्यक्रम आयोजित करावे असेही आयोजकांना सुचित केले. माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व अजीव पाटील यांच्या सहकार्याने दर महिन्याला भरणारी साहित्य चावडी नंदाखालला भरवली तर मीही त्यात सक्रिय होऊन जबाबदारी घेतो अस मत सरपंच यांनी मांडले. चावडी एकाच ठिकाणी न भरवता तिला फिरती केली पाहिजे कारण चावडी सारख्या कार्यक्रमाची आज समाजाला एकत्रित बांधून ठेवण्यासाठी नितांत गरज आहे असेही ते म्हणाले. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा हीएक शिकवण आहे. पिता पुत्र आणि पवित्र आत्मा असे म्हणून कोणत्याही शुभ कार्याला आम्ही सुरुवात करतो. भगवान येशूचा जीवनपट या विषयावर सरोज भिडे, समीर पराडकर, गोविंद घरत, सुचित्रा पितळे, मानसी शिकवण, तृप्ती भंडारे स्वाती नाईक अशा अनेक साहित्यिकांनी येशूंविषयी आपले विचार व्यक्त केले. काही पुस्तकातील उताराचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर तराळे यांनी केले असून सौ सुरेखा कुरकुरे यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विक्रांत केसरकर व सौ दीपाली जाधव यांनी परिश्रम घेतले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

30 DECEMBER 2024 To 05 JANUARY 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 12/28/2024 8:34 PM Page 1



# शाळेत शेती विषय असावा –सोनम वांगचुक

## जैन हिल्सवर राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा; बळिराजाचे केले औक्षण



**जळगाव/प्रतिनिधी**

शेतकरी एक दाण्यापासून हजार दाण्यांचे उत्पादन परिश्रम आणि विश्वासाने घेतात. त्यासाठी नैसर्गिक आपत्तींचीही ते तमा बाळगत नाही. शेतकरी आणि शिक्षक ह्यांना नेहमी गुरूस्थानी मानले पाहिजे. कारण दोघांमुळेच आपल्या प्रत्येकाच्या जीवनात परिवर्तन होत असते. प्रत्येक शिक्षण संस्थांमध्ये, विद्यालयांमध्ये शेती हा विषय प्रात्यक्षिकासह शिकवला पाहिजे. विद्यार्थ्यांवर स्वत: शेतकरी होण्याची किंवा जे भोजन बळीराजामुळे मिळत आहे त्यामुळे त्यांचा आदर करण्याचा संस्कार आपोआप होईल. शेतकऱ्यांकडे असलेल्या ज्ञान समजून घेतले पाहिजे, सर्वात पारदर्शक व्यवहार म्हणजे शेतकऱ्यांचा आहे असे मनोगत सोनम वांगचुक यांनी व्यक्त केले. जैन हिल्स वरील कृषी संशोधन प्रात्यक्षिक केंद्रावर १४ जानेवारी २०२५ पर्यत सुरू असलेल्या हायटेक शेतीचा 'नवा हुंकार' या कृषीमहोत्सवात शेतकऱ्यांशी सोनम वांगचुक यांनी संवाद साधला. २३ डिसेंबर हा राष्ट्रीय शेतकरी दिन शेतकऱ्यांचा सन्मान करुन साजरा करण्यात आला. आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र मधील शेतकऱ्यांचे औक्षण आणि गांधी टोपी, तर महिला शेतकऱ्यांना रूमाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सोनम वांगचुंक यांच्या समवेत जैन परिवारातील अभंग जैन, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल ढाके, डॉ. बि. के. यादव, एस. एन. पाटील, संजय सोन्नजे, अनिल जोशी, दीपक चांदोरकर, गिरीष कुळकर्णी यांच्यासह सहकारी उपस्थित होते. शेतकरी दिनानिमित्त मार्गदर्शन करताना सोनम वांगचुक पुढे म्हणाले की, जैन इरिगेशन ही शेतकऱ्यांसाठी प्रभावी काम करणारी संस्था असून त्यांच्याशी जुळल्यानंतर लडाखमध्ये भेडसवणारा पाण्याचा प्रश्न आईस स्तुफा यातून दूर झाला. यासाठी विशिष्ट तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. शिक्षण क्षेत्रामध्ये कृषी हा विषय येण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. कारण भोजन कसे तयार होते, त्यासाठी काय परिश्रम घेतले जाते, याची जाणिव निर्माण व्हावी. गणित, बायोलॉजी, मायक्रो बायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, विज्ञान यासारखे विषय शेतीसाठी पूरक आहेत त्याचे ज्ञान घ्यायला हवे. शेती हा विषय महत्त्वाचा असल्याने विद्यालयात शेती केली जावी, प्रत्येक विद्यार्थी हा शेतकरी व्हावा. असे माझे स्वप्न आहे. लडाख मध्ये फळ, फुलांच्या वाढीसाठी जैन इरिगेशन सोबत काम करत आहे. सफरचंदासह अन्य फळबागांवर संशोधनात्मक कार्य केले जात आहे जेणे करून शेतकऱ्यांचा फायदा होईल. जगातील सर्वात गोड खुबानी लडाखमध्ये उत्पादित केली जाते त्यावरही जैन तंत्रज्ञानातून काही करता येईल का? यासाठी चर्चा सुरू आहे. कमी पाण्यात कमी खतांमध्ये उत्पन्न दूप्पट करण्याचा प्रयत्न जैन हायटेक शेतीचा नवा हुंकार या प्रदर्शनात दिसतो. या प्रदर्शनात शेतकऱ्यांनी येऊन माहिती घ्यावी असे आवाहनही सोनम वांगचुक यांनी केले.डॉ. बी. के. यादव यांनी जैन इरिगेशन आणि सोनम वांगचुक यांच्यासोबत आईस स्तूफा ह्या संकल्पनेविषयी सांगितले. प्रास्ताविक एस. एन. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन दीपक चांदोरकर यांनी केले.

# मराठी शाळेला आणि मराठीला मरण नाही -अरुण म्हात्रे



**विरार/प्रतिनिधी**

विरार येथील चंदनसार ह्या गावातील वासंतीबाई विष्णु ठाकूर शाळेतील एक संवेदनशील विद्यार्थी प्रिय शिक्षिका प्रतिभा पाटील म्हात्रे हिच्या प्रयत्नातून साकार झालेले विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे कोवळे आविष्कार दाखवणारे एक पुस्तक म्हणजे पंख सृजनाचे या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांच्या शुभहस्ते आणि जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष काशिनाथ गोविंद पाटील यांच्या उपस्थितीत श्री सत्य नारायण पार्टी हॉल, चंदनसार, विरार पूर्व येथे नुकतेच झाले. यावेळी अरुण म्हात्रे म्हणाले विद्यार्थ्यांवरील प्रेमाने त्यांच्या प्रतिभेला पंख देणारे, प्रेरणा देणारे असे पुस्तक रूप देणारी अलीकडच्या काळात पाहिलेली हि पहिली मराठी शाळेतील शिक्षिका. प्रतिभाच्या ह्या विद्यार्थी कौतुकात तिच्या पतीने – विनोद किशोर म्हात्रेने पुस्तकात सुंदर चित्र रेखाटने काढून आपला प्रेमळ वाटा उचलला आहे. विनोदच काय, प्रतिभाचे अवघे घरच – अगदी सासू सासरे तिच्या ह्या प्रयत्नात सहभागी झाले होते. शाळेतील शिक्षक शकुंतला पाटील, नारायण लांडगे पाटील, आनंदा देसले आणि किरण दळवी,विजया अजित भोईर ह्यांनीही ह्या पुस्तक निर्मितीत आपला सहभाग दिला. या काव्यसंग्रहाचे प्रकाशन हि मोठ्या थाटात विद्यार्थी शिक्षक आणि पालक यांच्या उपस्थित झाले. या प्रकाशनाला शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे स्वरूप आले होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण शंकर दळवी यांनी केले. वसईच्या डिंपल पब्लिकेशन यांनी सृजन प्रतिभेचे हे पुस्तकं छापले आहे. त्यांनी या कौतुक सोहळ्यात हे पुस्तक छापून आपला वाटा उचलला. पुस्तक प्रकाशनाला ज्येष्ठ प्रकाशक अशोक मुळे, कौतुक मुळे हजर राहून ह्या विद्यार्थी प्रेमात आपणही जातीने हजर आहोत हे दाखवले. अजून मुलांवर पुत्रवत प्रेम करणारे शिक्षक आहेत, शिक्षकांचे कौतुक करणाऱ्या अशा शाळा आहेत आणि अशा मुलांच्या कौतुकात–भाषेच्या प्रसारात सामील होणारी शिक्षकांचा सन्मान करणारी गावे, माणसे आहेत तो पर्यंत मराठी शाळेला आणि मराठीला कुठला धोका नाही.. मरण नाही..हे नक्की.

# प्रहार बांधकाम संघटनेचे गटविकास अधिकारी यांना निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील वलांडी व परीसारतील सर्व बांधकाम मजूरांची नोंदणी करण्यात यावी व नोंदणी करण्यासाठी लागणाऱ्या ९० दिवसाच्या प्रमाणपत्रावर ग्राम सेवक यांना सही करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निवेदन देवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना प्रहार कामागर संघटनेच्या वतिने देण्यात आले. ग्रामिण भागातील असंघटीत बांधकाम कामगारांना ईमारत मंडळातर्फे नोंदणी करण्यासाठी ग्रामसेवक यांच्या कडून ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावर शिका व स्वाक्षरी लागते. तर ग्रामसेवक हे सही व शिक्का देण्यास नकार देत आहेत. तरी ग्रामसेवक यांना वलांडी ग्रामपंचायत येथे सविस्तर बैठक करून बोलूनही सही देत नाहीत व सही देण्याचा नकार देत असल्याने ना विलाजाने बांधकाम मजूरांना गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयास जाऊन भेट घेऊन जे अधिकृत बांधकाम कामगार आहेत त्यांना न्याय मिळावा यासाठी निवेदन देण्यात आले. पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या मार्फत देवणी तालुक्यातील प्रत्येक खेड्यातील ग्रामपंचायतीना जिल्हा परिषद लातूर यांनी दिलेल्या जि आर जिल्हाभरातील सर्व पंचायत समीतीना दिला आहे. सिओने दिलेल्या जिआर नूसार खऱ्या बांधकाम मजूरांना ९० दिवसांच्या प्रमाण पत्रावर शिका मोर्तब करून द्यावे असे पत्र आम्ही पण तालुक्यात काढु असे आश्वासन सहाय्यक गटविकास अधिकारी मुळे यांनी बांधकाम मजूरांना दिला. यावेळी प्रहार कामगार संघटनेचे अध्यक्ष अंतेश्वर सूर्यवंशी, जलील बौडीवाले, अक्रम शेख, दत्ता सूर्यवंशी, मूकेश कांबळे, मन्नान शेख, तोसिफ शेख, परमेश्वर सूर्यवंशी, तोफीक जमिनदार आदी बांधकाम मजूर पदाधिकारी उपस्थित होते.

# वालीव येथे अंगावर गाडी जाऊनही चिमुकला बचावला!

**वसई/प्रतिनिधी**

वसईत एका खाजगी कंपनीच्या 'ओला' वाहनचालकाने रस्त्यात खेळत असलेल्या एका ६ वर्षाच्या मुलाच्या अंगावरून गाडी नेली. या भीषण मुलगा या अपघातातून बचावला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुलाच्या अंगावर निर्दयपणे गाडी चालवणारा वाहन चालक अपघातानंतर न थांबता फरार झाला आहे. वालीव पोलीस या चालकाचा शोध घेत आहेत. वसई पूर्वेच्या वालीव येथील नाईक पाडा येथे बुधवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास ही घटना घडली. येथील एका इसमाने ओला प वरून खासगी वाहन (एम एच ०१ ईएम ३२४५) बुक केले होते. गाडी आल्यावर प्रवासी त्यात बसला. चालकाने गाडी सुरू केली. त्याचवेळी समोरील मोकळ्या जागेवर राघव कुमार चव्हाण (६) हा चिमुकला खेळत होता. मात्र ओला चालकाने बेदरकारपणे त्याच्या अंगावरून गाडी



नेली. चाकाखाली मुलगा आल्याचे लक्षात आल्यानंतरही गाडीचालक थांबला नाही आणि भरधाव वेगाने पुढे निघून गेला. काही अंतर गाडीने त्याला फरफटत नेले. गाडी अंगावर जाऊनही मुलगा आश्चर्यकारकरित्या बचावला आणि उभा राहिला. मात्र तो गंभीर जखमी झाला. त्याला वालीव येथील वालवादेवी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्याच्या पाठीला १४ आणि कपाळावर ९ टाके आले आहेत याशिवाय पायाला दुखापत झाली आहे. या संपूर्ण अपघाताचे चित्रण सीसीटीव्ही कॅमेर्यात कैद झाले आहे. आम्ही ओला चालकाचा नंबर शोधून त्याला फोन केला मात्र त्याने जे करायचं ते करून घ्या असं उत्तर दिल्याचे जखमी मुलाच्या आईने सांगितले. अपघातानंतर तेथे उपस्थितांनी चालकाला थांबविण्याचा प्रयत्न केला मात्र चालक न थांबता भरधाव वेगाने निघून गेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. हा चालक या घटनेनंतर फरार झाला आहे. आम्ही याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून आरोपी चालकाचा शोध घेत आहोत, अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आशुतोष चव्हाण यांनी दिली.

# मोबाईल टॉवरचे सर्व्हर रुममधील बॅटरी चोरी करून विक्री करणाऱ्या ९ जणांच्या टोळीला अटक

**विरार/प्रतिनिधी**

मोबाईल टॉवरचे सर्व्हर रुममधील बॅटरी चोरी करून त्या विक्री करणाऱ्या ९ जणांच्या टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी आरोपीकडून ६ गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे. भालिवली गावात लावण्यात आलेल्या मोबाईल टॉवरच्या कॅबिन रूममधील इलेक्ट्रीक बॅकअप करीता असलेल्या एकूण २४ बॅटरी चोरट्याने कॅबिनचे लॉक तोडून चोरून नेल्या होत्या. मांडवी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. गेल्या काही महिन्यांपासून पोलीस आयुक्तालय परिसरात मोबाईल टॉवरचे सर्व्हर रूममध्ये बॅटरी, इलेक्ट्रॉनिक्स पार्ट इत्यादी साधनांच्या चोरीच्या गुन्ह्यात वाढ झाल्याने वरिष्ठांनी गांभीर्य



लक्षात घेऊन अशा प्रकारच्या गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन गुन्ह्यांची उकल करण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्याच्या घटनास्थळी भेट दिली. गुन्ह्यांचे तांत्रिक विश्लेषण व बातमी दाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी अजित मानकर (३२), संतकुमार राजभर (४१), आकाश पांडे (२९), नवनाथ उत्तेकर (३२), अजय घाडी (२४), सुदीप राजभर (३०), बुल्लू राजभर (३७) हे व सदरचा चोरीचा माल खरेदी करणारे भंगार व्यवसायिक रमेश सिंग (३७) आणि किशोर पुरबिया (३७) यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन विचारपुस केल्यावर सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. या आरोपींना विरार आणि मांडवी पोलिसांकडे हजर करण्यात आले आहे. या आरोपींनी वसई, विरार, पालघर, वाडा, बोईसर इत्यादी परिसरात गुन्हे केले आहेत. आरोपींकडून ६ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोनि धनंजय पोरे, सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी उमेश भागवत, सफौ. अशोक पाटील, पोहवा मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, राकेश पवार, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, सुनिल पाटील, मनोहर तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, मसुब प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे तसेच सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी केली आहे.

# समुद्रकिनारी रिसॉर्ट पर्यटकांच्या प्रतिक्षेत

वसई : अर्नाळा, राजोडी, कळंब या वसई तालुक्यातील सागरी किनार्यावर असलेल्या रिसॉर्ट व छोट्या मोठ्या निवासी व पार्टीसाठी प्रसिद्ध असलेल्या हॉटेलचे नाताळच्या काळात हवे तसे बुकींग झालेले नाही. अशी रिसॉर्ट मालकांची तक्रार आहे. फॅमिली असलेल्या पर्यटकांनाच रिसॉर्टमध्ये घेतले जाते. भानगडी व मारामारीच्या घटनांमुळे व्यवसाय करायचा पण पर्यटकांना कसे आवरायचे; त्यामुळे ग्रुपवाल्या पर्यटकांना रात्री थारा दिला जात नाही असे समजते. रात्री रिसॉर्टमध्ये पहाटे पाचवाजेपर्यंत थांबण्यास मुभा आहे. मात्र रात्री बारा–एक वाजताच पर्यटक परत गेले तरी चालतील रात्री आम्ही मुक्काम करु देत नाही. कारण मौजेसाठी येणाऱ्या पर्यटकांचा धिंगाणा आवरणे कठीण जाते. व्यवसाय करायचा की, पर्यटकांना सावरायचे त्यापेक्षा काटेकोर नियमात रिसॉर्ट चालवित असल्याने पर्यटकांचा ओढा सध्या तरी कमी आहे. रिसॉर्टची संख्या वाढली असली तरी अनेक रिसॉर्ट बंद होण्याची शक्यता आहे, असेही काही मालकांनी याबाबत बोलताना सांगितले.

# मुंबई–अहमदाबाद महामार्गावर भीषण आगीत ट्रक जळून खाक



**डहाणू/प्रतिनिधी**

मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर आज सकाळी ११ वाजता डहाणूतील चारोटी टोल नाक्याजवळ एका ट्रकला भीषण आग लागल्याची घटना घडली. बिल्डिंग मटेरियल सप्लाय करणाऱ्या या ट्रकला शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेत ट्रकच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने चालकाने प्रसंगावधान राखल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस आणि अग्निशमन दलाने धाव घेतली. अग्निशामक दलाच्या अथक प्रयत्नांनंतर काही वेळातच आग आटोक्यात आणण्यात यश आले. महत्वाचे म्हणजे, या महिन्यात महामार्गावरील ही चौथी आग लागण्याची घटना आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे वाहनचालक आणि मालकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. महामार्ग प्राधिकरण विभागाकडे अद्याप स्वत:ची अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी टोल प्रशासनाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे महामार्ग प्राधिकरणाने या गंभीर समस्येकडे लक्ष देण्याची मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.



30 DECEMBER 2024 To 05 JANUARY 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/28/2024 8:35 PM Page 1



# अल्पवयीन मुलीच्या हात्येप्रकारण जलद गती न्यायालयात चालणार

**कल्याण/प्रतिनिधी**



अल्पवयीन मुलीच्या हत्येप्रकारण जलद गती न्यायालयात चालविण्याची प्रक्रिया सुरु असून प्रकरणात विशेष अभियोक्ताची नेमणूक केली जाणार असल्याची माहिती ठाणे पोलिसांनी दिली. कल्याण येथील अल्पवयीन मुलीला विशाल गवळी याने राहत्या घरात हत्या केली. हत्येनंतर त्याची पत्नी साक्षी घरी आली. विशालने तिला घरात घडलेली घटना सांगितली. विशालने पत्नी साक्षीच्या साहाय्याने रात्रीच्या वेळेत घरातील मृतदेहाची विल्हेवाट लावण्याची योजना आखली. घरात पडलेले रक्त दोघांनी साफ केले. त्यानंतर त्याने रिक्षा चालक मित्राला संपर्क साधून घरी बोलाविले. मृतदेह असलेली बॅग रिक्षेत ठेवण्यात आली. पत्रीपूल मार्ग आधारवाडी, गांधारी पुलावरून विशाल, साक्षी आणि रिक्षा चालक मृतदेह असलेली पिशवी घेऊन भिवंडी पडघा दिशेने निघाले. बापगाव भागात अंधार तेथे कोणीही आजुबाजुला नाही. वाहनांची वर्दळ नाही पाहून विशालने मृतदेह बापगाव कबरस्तान भागातील जंगली झुडपे असलेल्या भागात फेकला. तेथून ते तातडीने निघाले. विशालने आधारवाडी चौकातील एका दुकानातून मद्य खरेदी केले. तेथून तो तात्काळ त्याने आपल्या पत्नीचे माहेर असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील गावी रेल्वेने निघून गेला. त्याला पोलिसांनी अटक केली आहे. हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालविण्याची प्रक्रिया सुरु असून प्रकरणात विशेष अभियोक्ताची नेमणूक केली जाणार असल्याची माहिती गुन्हे अन्वेषन शाखेचे उपायुक्त अमरसिंग जाधव यांनी दिली.

# लाचखोर वनक्षेत्रपालाकडे सापडले घबाड; सव्वा कोटींची रोकड आणि ५८ तोळे सोने





**वसई/प्रतिनिधी**

जमिनीच्या प्रकरणात २० लाख रुपयांची लाच घेणाऱ्या मांडवीचा वनक्षेत्रपाल संदीप चौरे याच्या मिरा रोड येथील घरात एक कोटी ३७ लाखांची रोकड आणि ५८ तोळे सोने आढळून आले आहे. जमिनीच्या बाजूने निकाल देण्यासाठी मांडवी परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल संदीप चौरे याने २० लाखांची मागणी केली होती. त्यानुसार मंगळवारी पालघरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्याविरोधात मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्याला पकडण्यासाठी सापळा लावला. मात्र तो फरार झाला होता. रात्री उशिरा ठाण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्या मिरा रोड येथील पूनम नगरमधील आसोपालव सोसायटीच्या घरात झडती घेतली. या इमारतीच्या डी विंगमध्ये चौरे याचे ६०१ आणि ६०२ अशा आलिशान दोन सदनिका आहेत. त्यात तो पत्नी आणि मुलांसह राहात होता. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रोख रकमेसह १ कोटी ३१ लाखांची रोकड आणि ५८ तोळे सोने जप्त केले आहे.

या गुन्ह्यात वापरलेले वाहनही जप्त करण्यात आले आहे. चौरे याचे बीड जिल्ह्यातील खंडाळा येथे तसेच नवी मुंबई येथे घर आढळून आले आहे. याशिवाय त्याच्याकडे शासकीय अग्निशस्त्र (पिस्तूल) आणि ६ जिवंत काडतुसेदेखील असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तक्रारदार यांच्या मालकीची ७ गुंठे जागा वसईतील सासूपाडा येथे आहे. २००७ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनविभागाने ही जागा ताब्यात घेऊन सील केली होती. हे प्रकरण मांडवी परिक्षेत्राकडे प्रलंबित होते. या प्रकरणात तक्रारदाराच्या बाजूने वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करून ती परत मिळवून देण्याचे आश्वासन मांडवी परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल एस.टी. चौरे याने दिले होते. त्यासाठी २० लाखांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. या लाचेच्या रकमेचा १० लाखांचा हप्ता घेण्यासाठी स्वीकारण्यासाठी चौरे आणि त्याचा साथीदार असलेला खासगी इसम चंद्रकांत पाटील हे दोघे मंगळवारी दुपारी वसई पूर्वेतील एव्हरशाईन सिटीत आले होते. तेथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावला होता. मात्र त्याची कुणकुण लागताच चौरे पैसे न स्वीकारता निघून गेला. या प्रकरणात चौरे याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने या दोघांविरोधात मांडवी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याच्या कलम ७,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# मटका अड्ड्यावर पोलिसांची कारवाई; जुगाऱ्यांची पळापळ



**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जुगार मटका अड्डे सुरू असून सरत्या वर्षाच्या शेवटच्या सत्रात या मटका जुगार अड्ड्यांवर पोलिसांकडून कारवाईचे सत्र सुरू झाले आहे. शहरातील तिरूपती हॉस्पीटल समोर, भंगारवाल्याचे गल्लीतील मोकळ्या जागेत मटका जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाल्यावर भिवंडी शहर पोलिसांच्या पथकाने या ठिकाणी कारवाई केली. त्यावेळी तेथील जुगार मटका खेळणाऱ्या नागरिकांची पळापळ सुरू झाली. पोलिसांनी दहा नागरिकांना ताब्यात घेत तेथून ५१८० रुपये मुद्देमाल जप्त करीत त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. या कारवाई वेळी तेथे जुगार खेळण्यासाठी आलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली व त्यांनी तेथून मिळेल त्या मार्गाने पळापळ सुरू झाली होती.

# भिवंडीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी १५ दिवसांचे अल्टिमेटम

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत असून यावर वाहतूक पोलिसांनी अनिर्बंध वाहन चालकांना निर्बंध घालावा तर पालिका प्रशासनाने तातडीने रस्ते दुरुस्ती करावेत यासाठी १५ दिवसात परिस्थिती मध्ये सुधारणा करावी असे अल्टिमेटम भिवंडी पश्चिमचे आमदार महेश चौघुले यांनी दिले आहे. शहरातील वाहतूक समस्या सोडवणूक बाबत वाहतूक पोलीस विभागाचे उपायुक्त यांच्या सोबत आयोजित बैठकीत त्यांनी हा इशारा दिला आहे. यावेळी वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त शरद ओव्हाळ, पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, वाहतूक पोलीस अधिकारी यांसह शिष्टमंडळातील पदाधिकारी माजी सभागृह नेते शाम अग्रवाल, अशोक जैन, अँड किशोर जैन, दादा गोसावी सहभागी झाले होते. शहरातील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण सुरू असतानाच अनेक मार्गावर वाढत्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक नागरीक विद्यार्थी हे सर्वच त्रस्त झाले आहेत.त्यामुळे या बैठकीसाठी आमदार महेश चौघुले हे स्वतः दुचाकी वरून येत सहभागी झाले होते. शहरातील वाहतूक कोंडीची सोडवणूक करण्यासाठी संबंधित विभागाने येत्या १५ दिवसात तात्काळ उपाय योजना करावी अशी मागणी महेश चौघुले यांनी केली. वाहतूक कोंडीत अरुंद रस्ते ही समस्या असून पालिकेने शहरातील रस्ता रुंदीकरण तात्काळ पूर्ण करावी तसेच शहरातील रस्त्यां वरील खड्डे दुरुस्त करावेत अशी मागणी महेश चौघुले यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

# वसई तालुका कला क्रीडा महोत्सवत फुटबॉल स्पर्धेचे उदघाटन!



वसई : ३५व्या कला क्रीडा महोत्सवातील फुटबॉल स्पर्धेचे आज मान्यवरांच्या उपस्थिती उदघाटन करण्यात आले. वसई तालुका कला क्रीडा मोहोत्सवतील फुटबॉल स्पर्धेला आज सुरुवात झाली या स्पर्ध्येत ८५ संघांनी सहभाग घेतला आहे. या स्पर्ध्येचे फुटबॉलला किक मारून राजेश जोशी उदघाटन केले. यावेळी माजी परिवहन सभापती प्रिंतेश पाटील, बर्वे एज्युकेशनचे प्रशांत गोसावी, तन्मय नेरकर, देवेंद्र दांडेकर आणि कला विकास मंडळाचे राजेश जोशी उपस्थित होते.

पान १ वरून....

## चारित्र्याच्या संशयावरून वेठीस ...

असताना त्यांना एक मुलगा ही झाला. बाबा सय्यद याला दारूचे व्यसन लागले. दारूचे नशेत तो सिमरनवर संशय घेऊन तिला मारहाण करू लागला. सिमरन ही दिसायला देखणी आणि मादक असल्याने कोणाच्या ही नजरेत ती सहज भरत होती. त्यामुळे ती सहज जरी कोणाशी बोलली तरी बाबा हा तिच्यावर संशय घेत होता. या कारणातून त्या दोघांचे भांडण विकोपाला गेले. सिमरन ही त्याच्या त्रासाला कंटाळलेली होती. या दरम्यान तिच्या वडिलांचे निधन झाले तर इकडे बाबाचा त्रास वाढल्याने तिने बाबाला सोडण्याचा निर्णय घेतला. ती आपल्या चार वर्षाच्या मुलाला घेऊन महाराष्ट्रात वाळुज येथे रोजगारासाठी आली. वाळुज महानगरात ती काम करीत असताना तिची ओळख ही जहिर शेख याच्याबरोबर झाली. २१ वर्षीय जहिर हा तिच्याबरोबरच काम करीत होता. देखण्या सिमरनला पाहून तो कळत न कळत तिच्या प्रेमात पडला. ती नवऱ्याला सोडून एका मुलासह राहयला आहे हे जहिर शेख याला माहित असल्याने तो तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करीत होता. जवळ पास चार सहा महिने त्या दोघांची ऑख मिचोली चालू होती. जहिर याच्या मनात काय आहे हे तिने ओळखले होते. ती ही त्याला लाईन देत होती. त्यामुळे त्या दोघांना एकत्र यायला वेळ लागला नाही.

त्या दोघांनी ही २२ जून २०२४ रोजी नोटरी पध्दतीने प्रेम विवाह केला. त्या दोघांनी प्रेम विवाह केल्याने सिमरन ही जहिरच्या घरात येवून राहू लागली. परंतु ही गोष्ट जहिर याची आई नझिजा यांना पटलेली नव्हती. आपल्या मुलाने एका विवाहितेबरोबर लग्न करावे ही गोष्ट तिला खटकत होती. कारण सिमरनला अगोदरच तिच्या पहिल्या नवऱ्यापासू चार वर्षाचा मुलगा होता. जहिरने कमीत कमी याचा तरी विचार केला असता तर बरे झाले असते असे नझिया यांना वाटत होते.त्यामुळे त्या सिमरनला पटवून घेत नव्हता. सासू सुनेची नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणातून रोज भांडणे होऊ लागली होती. सिमरन गरोदर असताना देखील जहिर सोबत कामाला जात होती. दोघे ही सकाळी कामाला गेले की, संध्याकाळी उशिराच घरी परतत होते. त्यातच घरातील सगळे कामे सासु नझिया यांना करावे लागत होते. यामुळे ती मुलगा जहिर याला सिमरन विषयी वेगळेच सांगत होती. त्या दोघांत ती भांडणे लावून देत होती. सिमरनच्या पहिल्या मुलाचा ती तिरस्कार करीत असल्याने सासून सुनेच फारसे पटत नव्हते. भांडणात सिमरन ही सासू नझिया यांना उलटे बोलत असल्याने तिच्या ही रागाचा पारा चढत होता. जहिर ही हल्ली घरातील भांडणाने रोज दारू पिऊ लागला होता.भांडणात तो तिच्यावर संशय घेऊन तिच्या चारित्र्यावर शिंतोंडे उडवित होता. एक तर सिमरनला पहिल्या नवऱ्यापासून ही सुख मिळाले नाही त्यातच तिने आपल्या पेक्षा लहान असणाऱ्या जहिरशी लग्न केल्याने त्याच्याबरोबर ही तिचा संसार सुखासमाधानाचा होत नव्हता. जहिर हा रोज दारू पिऊन येऊन तिला मारहाण करून त्रास देत असल्याचे तिने आपल्या आईला सांगितले होते.या भांडणातून ती आपल्या माहेरी निघून गेली होती. माहेरी तिने आपल्या आईला नवऱ्या विषयी आणि सासु विषयी सांगितले होते.नवरा पैशासाठी त्रास देत असून तो आपल्याला दुसऱ्या पुरूषाबरोबर संबंध ठेवायला भाग पाडत आहे तसे मी केले नाही तर माझ्या चार वर्षाच्या मुलाला मारून टाकण्याची धमकी ही देत असल्याचे तिने आपल्या आईला सांगितले. या कारणातून तिची आई फुलवंती ही तिला परत वाळुज येथे घेऊन आली. तिने सिमरनची सासू नझिया आणि जावई यांना याचा जाब विचारला असता त्या मायलेकांनी उलट तुमची मुलगी ही बाहेरख्याली असून तीचे बाहेर अनेक पुरपुरूषांशी संबंध आहेत असे फुलवंती यांना सांगून तिला गप्प गार बसविले. सिमरन ही अगोदर पासूनच अनेकांच्या नादाला लागली होती. त्यातूनच तिचे इतर परपुरूषासोबत संबंध आहेत मी स्वत: तिला दुसऱ्याबरोबर पकडले आहे असे तो फुलवंती यांना म्हणाला. त्यावर सिमरन आणि तिच्या आईचा त्रागा झाला. त्यावेळी त्याचेत मोठी भांडणे झाली. सिमरन आणि तिच्या आईने जहिर आणि त्याच्या आई विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावेळी पोलीसांनी जहिर आणि नझिया यांना समज देवून सोडून दिले.त्या दोघीनी आपल्या विषयी पोलीसात तक्रार दाखल केल्याने जहिर आणि त्याच्या आईचा रागाचा पारा चढला. सिमरनची आई तिला जहिर बरोबर सोडून परत आपल्या गावी गेली. ती गावी गेल्यावर जहिरने आणि त्याच्या आईने परत तिला त्रास दयायला सुरूवात केली. या दरम्यान परत एकदा पाच महिन्याची गरोदर राहिली. त्यावेळी अगादेरच जहिर आणि नझिया यांना तिच्यावर संशय असल्याने सिमरनच्या पोटात असलेले मुल आपले नाहीच असे जहिर याला वाटू लागले. त्याला खतपाणी हे नझिया यांनी घातले. सिमरनच्या पोटात दुसऱ्या कोणाचे तरी मुल आहे तु अजून बाप होण्याच्या वयाचा नाहीस असे त्या जहिरला म्हणू लागल्या. या कारणातून सिमरनला ते दोघे ही मारहाण करू लागले. सिमरन ही भांडणात जहिरवर तु काय नामर्द आहेस काय? तु काय माझ्याबरोबर लग्ना आधी आणि लग्नानंतर झोपला नाहीस काय? म्हणत त्याच्या वर्मावर बोठ ठेवले. हल्ली रोज जहिर तिच्यावर संशय घेत होता. दारू पिऊन आला की, तो तिला मारबडव करीत होता. आपण दुसऱ्यादा ही प्रेमविवाह करून चुकलो की काय असे सिमरनला वाटत होते. ती परत परत आपल्या माहेरी आपल्या आईला फोन लावून होणाऱ्या त्रासाबद्दल सांगत होती. त्या दोघींना ही यामागे सासू निझिया ही आहे तिनेच जहिरला एकाचे दोन करून सांगितले आहे हे माहित होते. म्हणून त्यांनी परत परत जहिरला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या डोक्यातील संशयाचा किडा हा काही वळवळायचा थांबला नाही. लग्नाअगोदरच सिमनरचे बाहेर लफडे असल्याने तिला पहिल्या नवऱ्याने मुलासकट सोडले आहे हे जहिर आणि नझिया यांनी ओळखले होते. त्यामुळे ते दोघे ही परत परत सिमरनला मारहाण करीत होते. जेणे करून ती त्याचे घर सोडून जाईला असे त्यांना वाटत होते. पण ती काही घर सोडून जायला तयार नव्हती. त्यातच त्या दोघांनी हल्ली सिमरनच्या पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलाला ही मारहाण करीत होते. त्यामुळे सिमरनच्या डोक्यात वेगळेच येत होते. परंतु ती पाच महिन्याची गरोदर असल्याने आणि तिच्या माहेरकडची परिस्थीती ही हालाखीची असल्याने तिला इकडे आड तिकडे विहिर असे झाले होते. गुरूवार दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी जहिर आणि त्याची आई नझिया या दोघांनी सिमरनला मारहाण करीत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत तिच्या पोटावर लाथा मारल्या.तिला जबरदस्ती काही तरी खायला देत होते. याची माहिती सिमरने त्या दिवशी आपल्या आईला फोनवर व्हिडीओ कॉल करून दिलेली होती. या दोघांनी केलेल्या मारहाणीत सिमरनची तब्येत बिघडली. तिला रक्तस्त्राव सुरू झाला होता. जहिरने आणि ससू नझिया यांनी तिच्या पोटावर लाथा मारल्याने रक्तस्त्रास होत होता. हे मुल माझे नाही, तु कोणाबरोबर झोपली आहेस त्याचे मुल आहे म्हणत ते दोघे तिला लाथा मारल्याचे तिने आईला सांगितले. तिची आई ही तिची कर्म कहाणी ऐकून हतबल झालेली होती अशातच शेजाऱ्यांनी सिमरनला वाळूज येथील एका खाजगी दवाखान्यात उपचारसाठी दाखल केले. परंतु तिची गंभीर अवस्था बघून तेथील डॉक्टरांनी तिला छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात नेण्यास सांगितले. तिला घाटी रुग्णालयात उपचारसाठी दाखल करण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. घाटी रुग्णालयातील पोलीसांनी या घटनेची माहिती मयत सिमरन हिची आई फुलवंती यांनी दिली. त्या आपल्या नातेवाईकासह ग्वालियरहून घाटी रुग्णालयात आल्या. त्यांनी सिमरनची अवस्था बघून तिच्या मृत्यूला तिचा नवरा जहिर आणि सासू नझिया हे असल्याचे पोलीसांना सांगून त्यांना अटक करून ताब्यात घ्या असे त्यांनी पोलीसांना सांगून त्या दोघा विषयी पोलीसात तक्रार दाखल केली. जोपर्यंत जहिर आणि नझिया यांना ताब्यात घेत नाही तोपर्यत मी सिमरनचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी ताब्यात घेणार नाही अशी भुमिका फुलवंती आणि त्याच्या नातेवाईकांनी घेतली. पो.निरी कृष्णा शिंदे यांनी त्यांना धीर देत संशयीत आरोपीवर कायदेशीर कारवाई करू असे आश्वासन दिल्यावर त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला. त्या अगोदर मृतदेहाचे शवविच्छेदन घाटी रुग्णालयात करण्यात आले. फुलवंती बाथम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी सिमरन परशराम बाथम (वय २९) हिच्या आणि तिच्या पोटातील पाच महिन्याच्या बाळाच्या मृत्यू प्रकरणी जहिर नजीर शेख (वय २१) आणि नझिया नजीर शेख (वय ४२) रा.दोघे ही जोगेश्वरी याच्या विरोधात वेगवेगळ्या कलमा खाली गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटने विषयी चौकशी करीत असता नाही होय म्हणत त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. पोलीसांनी त्यांना कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## जिल्ह्यातील पहिल्या शिक्षकेतर महिलेची मुंबई विद्यापीठाच्या 'सिनेट'वर नेमणूक!

**वसई/प्रतिनिधी**



सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात कार्यालय अधिक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या सौ.सुप्रिया यशवंत उराडे यांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार संचलीत मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर सिनेट (SENATE) वर नेमणूक झाली आहे. पालघर जिल्हयाच्या इतिहासात प्रथमच शिक्षकेतर संवर्गातून ही नेमणूक झाली आहे. सौ. सुप्रिया उराडे या आदिवासी समाजातील असून गेली ३४ वर्षे महाविद्यालयाच्या सेवेत कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या सामाजिक व प्रशासकीय कार्यासाठी आतापर्यंत आठ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर त्यांची निवड झाल्याने सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळीचे अध्यक्ष मा.सी.ए.सचिन कोरे, व्यवस्थापनाचे अन्य पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किरण सावे, उपप्राचार्य प्रा. महेश देशमुख, उपप्राचार्य डॉ.तानाजी पोळ तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी सुप्रिया उराडे यांचे अभिनंदन केले आहे.

पान ८ वरून....

## '३५ वा वसई तालुका कला ...

मोहोत्सवात कला विभागात एकूण ३४ प्रकारच्या तर क्रीडा विभागात एकूण ३८ प्रकारच्या स्पर्धा विविध वयोगटात होणार आहेत. मोहोत्सवात नव्याने निवडून आलेले नालासोपराचे आमदार राजन नाईक यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, देशातील सर्वातयमात मोठा कला क्रीडा मोहोत्सव हा माझ्या तालुक्यातवसुरु आहे त्याचा आनंद आहे, या मल्होत्सवाला जे जे सहाय्य लागेल ते माझ्याकडून आणि शासनाकडून करेन असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले, तर भारतीय संघाचा माजी कसोटीपट्टू संजय बांगर यांनी सांगितले की, मला २०१२ पासून मोहोत्सवाला यायचे निमंत्रण होते, परंतु काही ना काही कारणाने येता येत नव्हते, परंतु तबल १२ वर्षानंतर हा योग्य आला आहे मी पण ग्रामीण भागातूनच आलेला खेळाडू आहे. यापुढे शहरातून खेळाडू पुढे येणार नसून ते ग्रामीण भागातून येणार आहेत. कला क्रीडा मोहोत्सव हे येथील खेळाडू आणि कलाकारांना मिळालेले व्यासपीठ आहे.या मोहोत्सवाच्या आयोजकांनी कार्यक्रमासाठी विविध खेळातील प्रशिक्षकांनी बोलवावे त्यांचा नजरेत येथील खेळाडू येतील आणि येथील खेळाडूंना त्याचा फायदा होईल. या कार्यक्रमा नंतर भारताची गौरव गाथा या प्रदर्शनाचे उद्घाटन पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौघुले यांच्या हस्ते वसई विकास बँकेच्या मुख्यालयात करण्यात आले. कार्यक्रमच्या शेवटी वसई कला क्रीडा मोहोत्सवाचे पाहिले अध्यक्ष मुकेश सावे यांनी शेवटी आता पर्यंत कला क्रीडा मोहोत्सवाची वाटचाल आणि येणाऱ्या काळातील रूपरेषा सर्वा सर्मोर मांडली. अशा कार्यक्रमासाठी तरुणांनी पुढे येण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन संगीता सीरोजो यांनी केले.

## जिल्ह्यातील प्रत्येक गावातील...

योजनेचे भूमीपूजन करण्यात आले. जिल्हाधिकारी गोविंद बोडके प्रस्ताविकपर भाषणात म्हणाले की, या जिल्हयातील आदिवासींसाठी विविध योजना राबवून जीवनमान उंचविण्याचे काम केले आहे. विहिरी, रस्ते, शेततळे, बांबू उत्पादन, अशा विविध योजना राबविल्या आहेत. तसेच आदिवासी बांधवांना वनपट्टे वाटपात पालघर हा पहिला जिल्हा आहे. तसेच अशा विविध योजनांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांना लखपती करण्याचा शासनाचा मानस आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. शेवटी खोमारपाडा गावचे सरपंच विलास गहला यांनी आभार मानले.

## चर्मकार समाजाचा उत्कर्ष ...

महोत्सवाचे आयोजन करणे, चालीरीती पुस्तिका व समाजधुरिणांची माहिती पुस्तिका तयार करणे हे कार्य करण्यात येईल असे सुचित केले या करिता समाज बांधवांचा सहभाग महत्त्वाचा आहे असे आवाहन केलं, सचिव सुभाष पाटील यांनी इतिवृत्त वाचन केलं, कार्याध्यक्ष भगिरथ भोईर यांनी वार्षिक अहवाल वाचन केला,प्रमुख सल्लागार दीपक खांबीत यांनी मनोगत व्यक्त केलं, संगीता जाधव यांनी सभा सुचना वाचन केली, हरेश्वर जाधव यांनी २०२३-२४ जमा-खर्च वाचन केलं, उपाध्यक्ष संदिप राऊत यांनी अंतर्गत हिशोब तपासणी अहवाल वाचन केलं, संगीता जाधव यांनी उपस्थितांच आभार व्यक्त केलं, यावेळी उपाध्यक्ष मिनेश वाळींजकर, राजश्री जाधव, डॉ.प्रदिप जाधव, संगीता खर्डीकर, संजय भोईर, ॲड.जितेंद्र मुकणे इत्यादी उपस्थित होते.

30 DECEMBER 2024 To 05 JANUARY 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 12/28/2024 8:35 PM Page 1



# तालुक्यातील खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय दुरावस्था; कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात



**मोखाडा/प्रतिनिधी**

मोखाडा तालुक्यातील अतिशय महत्वाचे आणि शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर राबता असलेले खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय मोडकळीस आलेले आहे. येथील कर्मचाऱ्यांना जीव मुठीत घेवून कार्यालयीन कामकाज करावे लागत आहे. प्रस्तुत कार्यालयाची ईमारत कधीही जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर असल्याने परिसरातील रहिवाशांच्या जीवीतालाही धोका होणार असल्याने सदर ईमारतीची तात्काळ डागडुजी करण्याची मागणी रहिवाशांकडून केली जात आहे. मोखाडा तालुका कृषी कार्यालयांतर्गत येणाऱ्या खोडाळा मंडळ कार्यालयातून परिसरातील ३० हून अधिक गावांतील शेतीविषयक कामकाज तसेच ईतरही अनेक विकास कामे केली जातात. त्यामुळे येथे शेतकर्यांचा मोठ्या प्रमाणावर राबता असतो. त्याचबरोबर शेतीविषयक मार्गदर्शन शिबीरे, मिटींग, दैनंदिन कामे इत्यादी कामे करतांना भेगा पडलेल्या भिंतीकडे पाहून कर्मचार्यांना नैमित्तीक कामांचा निपटारा करावा लागत आहे. मंडळ कृषी अधिकारी कार्यालयाची अवस्था अतिशय भयानक झालेली असून भिंतीसह छप्परावरही मोठे झाड उगवलेले आहे. या झाडाच्या मुळ्या थेट भिंत पोखरून कार्यालयात डेरेदाखल झालेल्या आहेत.त्यामुळे इमारतीचा धोका आणखीनच वाढलेला आहे. बांधकाम विभागासह जिल्ह्याच्या वरिष्ठ कार्यालयांनी या धोकादायक इमारतीची व परिसरातील रहिवाशांच्या जीवीताची दखल घेवून इमारतीची तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी परिसरातील रहिवाशांनी केलेली आहे. शासन एकीकडे ठाणा-मुंबईच्या धोकादायक इमारतींची काळजी घेत असतांना दुसरीकडे मात्र ग्रामीण आदिवासींच्या जीवावर उठलेल्या धोकादायक शासकिय इमारती मात्र बेदखल ठेवीत आहे, असा आरोप परिसरातील रहिवासी यांनी केला आहे.

सन १९७२ साली प्रशिक्षण व भेट योजना अमलात होती. त्यावेळी सदर ईमारत ही प्रशिक्षण व भेट योजनेकडे हस्तांतरित करण्यात आली होती. दरम्यानच्या ५० वर्षात या ईमारतीची कोणत्याही प्रकारची डागडुजी झालेली नाही. इमारतीच्या पश्चिमेकडील भिंतीवर मोठे झाड उगवले असून त्याची मुळे भिंतीत घुसली आहेत त्यामुळे सदर भिंत ही केव्हाही जमीनदोस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाजूलाच वस्ती असून खेटून असलेल्या घरांवर भिंतीचे अवशेष पडल्यास मोठ्या प्रमाणावर वित्त हानी होऊन संभाव्य जीवित हानी टाळता येणार नाही. त्यामुळे सदर इमारत तातडीने निष्काशीत करणे आवश्यक आहे. मात्र सदर इमारत धोकादायक नाही. तसेच सदरची प्रक्रिया ही मोठी असून सध्यातरी तशी गरज नाही, असे जिल्हा परिषद बांधकाम मोखाडा उप विभागाचे प्रभारी उपअभियंता अजय गायकवाड यांचे म्हणणे आहे.

# खोणी गावात बाहेरील मुस्लिमांना नमाजास बंदी



**डोंबिवली/प्रतिनिधी**

लैंगिक अत्याचार, गुन्हेगारीच्या वाढत्या घटना विचारात घेऊन डोंबिवली जवळील खोणी गावातील ग्रामस्थांनी गावामधील मस्जिदीमध्ये गावातील मुस्लिम समाजा व्यतिरिक्त बाहेरून येणाऱ्या मुस्लिम धर्मियांना नमाजास बंदी करण्याचा निर्णय घेतला आहे. या बंदीचा निर्णयामुळे खोणी गाव हद्दीत पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शुक्रवारी नेहमीप्रमाणे खोणी गाव हद्द परिसरातील मुस्लिम धर्मिय नमाज पठणासाठी खोणी गावाच्या वेशीवर आले. त्यावेळी खोणी ग्रामस्थांनी त्यांना संयमाने वस्तुस्थिती सांगून गावात प्रवेश करण्यास मज्जाव केला. बदलापूरमधील लैंगिक अत्याचाराची घटना, कल्याणमध्ये अत्याचारातून झालेली हत्या आणि वाढती गुन्हेगारी विचारात घेऊन गावातील महिला, मुली, लहान बाळांची सुरक्षितता महत्वाची असल्याने खोणी ग्रामस्थांनी बाहेरील मुस्लिम धर्मियांना गावात येण्यास शुक्रवारी प्रतिबंध केला. खोणी गाव पलावा, दहीसर, मोरी, मुंब्रा परिसरात येते. प्रत्येक शुक्रवारी खोणी गावातील मस्जिदीमध्ये या भागातील मुस्लिम समाजातील नागरिक नमाजासाठी येतात. खोणी गावातील मुस्लिमांना नमाज पठणासाठी ग्रामस्थांचा विरोध नाही. त्यांनी नियमितपणे त्यांचे धार्मिक कार्य करावे, त्याला आमचा विरोध नाही. फक्त बाहेरून येणाऱ्या मुस्लिमांना आमचा विरोध आहे, असे ग्रामस्थांनी सांगितले. शुक्रवार असल्याने बाहेरील मुस्लिम नागरिक अधिक संख्येने गावात येतील म्हणून शुक्रवारी सकाळीच ग्रामस्थांनी मस्जिदीकडे जाणारा रस्ता अडथळे उभा करून बंद केला होता. खोणी परिसरातून मस्जिदीत नमाजासाठी आलेल्या नागरिकांना गावकीच्या निर्णयाची माहिती देऊन त्यांना परत पाठविण्यात येत होते. मानपाडा पोलिसांना ही माहिती मिळताच अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कल्याण, डोंबिवली, दिवा ग्रामीण हद्दीतील बेकायदा चाळी, वस्त्यांमध्ये बांगलादेशी, नायजेरियन नागरिक राहण्यास आले आहेत. त्यामुळे गावांमधील नागरिकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. मुंबईतील मोठ्या गुन्ह्यातील गुन्हेगार डोंबिवली परिसरातून अटक केले जात आहेत. गावातील महिला, भगिनी, विद्यार्थीनी यांची सुरक्षितता राखणे ही ग्रामस्थांची जबाबदारी आहे. खोणी गावात दर शुक्रवारी बाहेरून सुमारे दीड हजाराहून अधिक मुस्लिम नमाजासाठी येतात. बालिकांवरील लैंगिक अत्याचार, लव्ह जिहाद ही सगळी प्रकरणे पाहता गावची, गावातील महिलांची सुरक्षितता राखणे महत्वाचे वाटत असल्याने खोणी गावा व्यतिरिक्त बाहेरून गावात नमाजासाठी येणाऱ्यांना गावात येण्यास बंदी केली आहे. गावातील मुस्लिम धर्मिय फक्त या मशिदीत नमाज पढतील. आम्ही स्थानिक मुस्लिम, पोलिसांना पूर्ण सहकार्य करत आहोत असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# 'तुळजाभवानी'च्या विद्यार्थ्यांचे स्पर्धेत यश




**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील संत ज्ञानेश्वरनगरातील तुळजाभवानी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केले. याबद्दल त्यांचे संस्थेच्यावतीने कौतुक करण्यात आले. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंबिका बहुउद्देशिय महिला मंडळाच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, तुळजाभवानी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात (४६ किलो वजन गट) तुळजाभवानी विद्यालयाची इयत्ता ९वीची विद्यार्थिनी अदिती बालाजी राठोड हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. तिची नांदेड येथे होणार्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यालयाच्या इयत्ता दहावीतील आदित्य बालाजी राठोड याने १७ वर्षे वयोगटात (५४ किलो वजन गट) जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या गटस्तरीय बाल नाट्य महोत्सवात उत्कृष्ट स्त्री अभिनयात अंकिता तानाजी देवकते हिला 'लेक वाचवा' या विषयावरील नाट्यात धनादेश व प्रमाणपत्र मिळाले. तसेच विज्ञान प्रदर्शनात प्रिया नीळकंठ चव्हाण हिच्यासह अन्य विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले. याबद्दल या विद्यार्थ्यांचे संस्थेतर्फे कौतुक करण्यात आले. सूत्रसंचालन एस.बी. शिंदे यांनी केले तर आभार व्ही. व्ही. लोहारे यांनी मानले.

# कडाक्याची थंडी, ढगाळ हवामान आणि अनियमित वाऱ्यामुळे खाडीतील मासेमारी बंद



**डहाणू/प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात झालेल्या बदलामुळे डहाणू तालुक्यातील मच्छीमार आणि मासळी खवय्यांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. कडाक्याची थंडी, ढगाळ हवामान आणि अनियमित वारे यामुळे डहाणू खाडीतील मासेमारी बंद झाली असून, मच्छीमारांच्या बोटी खाडीकिनारी उभ्या आहेत. बाजारात मासळीचा तुटवडा निर्माण झाला आहे. उपलब्ध होणाऱ्या मोजक्या मासळी प्रजातींमुळे मासळीचे दर गगनाला भिडले आहेत. परिणामी सामान्य खवय्यांच्या जेवणातील मुख्य पदार्थ महागड्या भावामुळे गायब होण्याच्या स्थितीत आहे. मासेमारी ठप्प झाल्याने मच्छीमारांच्या उत्पन्नावर थेट परिणाम झाला आहे. डहाणू, वाणगाव, चिंचणी आणि अन्य खाडीकिनारी भागातील शेकडो मच्छीमार कुटुंबांची रोजीरोटी या व्यवसायावर अवलंबून आहे. वातावरणातील बदलामुळे त्यांच्या हाताला काम नसल्याने ते आर्थिक संकटात सापडले आहेत. सुकी मासळी तयार करणार्या व्यवसायांवर देखील या परिस्थितीचा परिणाम झाला आहे. बाजारात सुक्या मासळीचा तुटवडा निर्माण झाला असून, ती देखील महागड्या दराने विकली जात आहे. हवामानातील अनियमित बदल आणि समुद्रातील तापमानात होणाऱ्या चढ-उतारामुळे मासेमारीच्या सिजनमध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

# ३४ हजाराच्या औषधांसाठी १४ लाख गमावले; ऑनलाईनरित्या तरुणीची फसवणूक




**ठाणे/प्रतिनिधी**

ऑनलाईनरित्या औषध खरेदीकरणे एका तरुणीला महागात पडले. या तरुणीला मधुमेह असून तीने ऑनलाईनरित्या ३४ हजार ५०० रुपयांचे औषध खरेदी केले होते. परंतु हे औषध सिमा शुल्क, वस्तू सेवा कर इतर विभागांनी अडविल्याचे सांगून तिच्याकडून १४ लाख ५० हजार ८६९ रुपये उकळण्यात आले. याप्रकरणी कापुरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणूक झालेली ३२ वर्षीय मुलगी कापुरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहते. तिला मधुमेहाचा त्रास आहे. त्यामुळे सुमारे दोन महिन्यांपूर्वी ती एका संकेतस्थळावर विशिष्ट कंपनीचे औषध शोधत होती. त्यावेळी त्या कंपनीचे औषध उपलब्ध असल्याचे तिला संदेश प्राप्त झाला. तरुणीने तात्काळ ऑनलाईनरित्या ३४ हजार ५०० रुपये भरून हे औषध खरेदी केले. दोन दिवसांनी तिला व्हॉट्सअॅप संदेश प्राप्त झाला. या संदेशात हे औषध पोर्तुगाल सिमा शुल्क विभागाच्या ताब्यात असल्याचे सांगितले. तेथे नोंदणीसाठी २० हजार ५६४ रुपये तिला पाठविण्यास सांगितले. त्यानुसार त्या तरुणीने ही रक्कम ऑनलाईनरित्या पाठविली. त्यानंतर तिला परवाना, कर आणि सिमा शुल्क रक्कम, औषधांचा विमा, रस्ते सुरक्षा आणि स्थानिक मुंद्राक, अन्न व औषध प्रशासन, केंद्रीय आणि राज्य वस्तू-सेवा कर विभाग अशा वेगवेगळ्या ठिकाणी औषध अडविण्यात आल्याचे सांगून तिच्याकडून टप्प्याटप्प्याने १४ लाख ५० हजार ८७९ रुपये उकळण्यात आले. काही दिवसांनी पुन्हा तिला संदेश प्राप्त झाला. हे औषध सिमा सुरक्षा दलाने अडविल्याचे म्हटले होते. त्यासाठी पैशांची मागणी करण्यात आली. तरुणीला संशय आल्याने तिने सिमा सुरक्षा दलाच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली. अशाप्रकारे कोणतेही औषध अडविण्यात आले नसल्याचे तिला सांगण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुरुवारी तिने याप्रकरणी कापुरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्याआधारे, गुन्हा दाखल झाला आहे.

# ठाणे शहरातील जवळपास १५० बसगाड्यांमधील सीसीटीव्ही सुविधा बंद, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न

**ठाणे/प्रतिनिधी**

कुर्ला येथील बेस्टच्या अपघातानंतर प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाच आता ठाणे परिवहन विभागाच्या १५० टीएमटी बसगाड्यांमधील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यन्वयित नसल्याचे समोर आले आहे. तांत्रिक बिघाडामुळे काही सीसीटीव्ही बंद असल्याचे टीएमटी परिवहन व्यवस्थापकांनी सांगितले. यामुळे टीएमटी परिवहनाच्या बसगाड्यांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कुर्ला येथे बेस्टच्या एका बसगाडीने भरधाव वेगात अनेक वाहनांना धडक देत काही पादचाऱ्यांना उडवले होते. या दुर्घटनेत सात लोकांचा मृत्यू झाला असून ४९ लोक जखमी झाले. या अपघातामुळे मुंबईसह अनेक शहरे हादरल्याने आता प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाच आता ठाणे परिवहन विभागाच्या १५० टीएमटी बसगाड्यांमधील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यन्वयित नसल्याचे समोर आले आहे. तांत्रिक बिघाडामुळे काही



सीसीटीव्ही बंद असल्याचे सांगण्यात आले आहे. बसगाड्यांमध्ये बसणाऱ्या प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, मागील काही दिवसांपासून या यंत्रणांची देखभाल आणि वेळेत दुरुस्ती न झाल्यामुळे यंत्रणा कार्यरत नाहीत. सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्यामुळे चोरी, छेडछाड आणि अन्य प्रकारच्या अनुचित घटना वाढण्याची शक्यता आहे. काही दिवसांपुर्वी टीएमटी बसगाडीमध्ये दुपारच्या सुमारास गर्दुल्यांनी चाकू दाखवून एका वाहकास धमकावल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये होती. त्यामुळे टीएमटी प्रवासी सेवेतील कर्मचारीही सुरक्षित नसल्याचे दिसून येत आहे. शहरातील अनेक बस स्थानकांवर आणि बसगाड्यांमध्ये मद्यधुंद किंवा अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या गर्दुल्यांचा वावर वाढला आहे. गर्दुल्यांकडून वाहकांना चाकू दाखवून धमकावण्याचे प्रकार समोर येत आहेत. अनेक बसमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा नसल्यामुळे गुन्हेगारीच्या घटना नोंदवणे कठीण झाले आहे.

ठाणे परिवहन (टीएमटी) व्यवस्थेत २०१९ पासून बसगाड्यांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली होती. सुरुवातीला ५० नवीन बसगाड्यांमध्ये ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. पुढे तयार होणाऱ्या प्रत्येक नवीन बसमध्येही सीसीटीव्ही यंत्रणा बसवली जाते. सध्या काही तांत्रिक बिघाडांमुळे या यंत्रणा बंद आहेत. या यंत्रणा पुन्हा कार्यरत करण्याचे काम सुरू आहे, असे टीएमटी परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी सांगितले.

# ज्येष्ठ नागरिकांपासून आम्हाला उर्जा मिळते -संदेश जाधव



**वसई/प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक हा कुटुंबाचा आधार आहे. कुटुंबाचा आनंद हा ज्येष्ठ नागरिकांना प्रेरणादायी असतो. ज्येष्ठ नागरिकांपासून आम्हाला नूतन उर्जा मिळते. आम्ही या संघासोबत आहे व राहणार असे प्रतिपादन वसई-विरार शहर महानगरपालिकेचे संदेश जाधव यांनी ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी संघाने आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या 'अमृत महोत्सव' समारंभात केले. या कार्यक्रमात ७५ वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ १९ डिसेंबर २०२४ रोजी ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संदेश जाधव प्रमुख पाहुणे उपस्थित होते. शरद जोशी यांनी अध्यक्षस्थान भूषविले. या कार्यक्रमाची सुरवात 'जय जय महाराष्ट्र माझा' सरोदे यांच्या सुमधूर गाण्याने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर भाषण संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुर्यकांत जोशी यांनी केले. त्यांनी संघाच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. तसेच यंदाच्या वर्षी २० ज्येष्ठ नागरिकांनी कला-क्रीडा महोत्सवात भाग घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन संदेश जाधव यांनी आपल्या भाषणातून मनपाच्या माध्यमातून संघास २ लाख रुपे अनुदान मिळून देण्याबाबत प्रयत्नशिल असल्याचे सांगितले. माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नारायण मानकर व आमचे सहकारी ज्येष्ठ नागरीकांसाठी मनपाच्या माध्यमातून अनेक योजना राबवल्या आहेत. तसेच यापुढेही आम्ही सदैव मदत करत राहू असे आर्जून सांगितले. त्यांनी स्व. हरिभाऊ म्हात्रे यांच्या आठवणी सांगितल्या. शरद जोशी यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणातून आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. की, आपण ७५ वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करतो. पुढे आपण १०० वर्ष पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचाही सत्कार करुया, असे आवर्जून सांगितले. या कार्यक्रमात पत्रकार आनंद गदगी, मा. नगरसेविका मीना अडसुळ यांचा शाळ व श्रीफळ देऊन सत्कार केला. ७५ वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुरेश सुत्रसंचलन सतिश अडसूळ यांनी केले तर नीला शर्मा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# चंद्रपाडा ग्रामपंचायतीचे पहिले सरपंच रमेश म्हात्रे यांचे निधन



**वसई/प्रतिनिधी**

जूचंद्र ग्रामपंचायती मधून चंद्रपाडा वाकीपाडा हि ग्रामपंचायत तयार झाल्यावर त्या ग्रामपंचायतीचे पहिले सरपंच, नाट्य निर्माता दिगदर्शक आणि क्रिकेटपट्टू रमेश यशवंत म्हात्रे यांचे ७३ व्या वर्षी काल निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी नयना म्हात्रे या आहेत. बाळासाहेब ठाकरे यांचा कट्टर शिवसैनिक, जूचंद्र गावातील नाट्य निर्माता आणि दिगदर्शक आणि चंद्रपाडा ग्रामपंचायतीचे पहिले सरपंच रमेश यशवंत म्हात्रे यांच्या निधना बदल शोक व्यक्त करण्यात येत आहे. जूचंदाची नाटय परंपरा चालवताना त्यांनी अनेक नाटकांची कीर्ती कला कुंज या संस्थे मार्फत निर्मिती आणि त्या नाटकांचे दिगदर्शन केले होते. त्यांनी लहान पण देगा देवा, संत ज्ञानेशवर, अश्रूंची झाली फुले अशी नाटके दिगदर्शित करून त्यात कामे हि केली होती. त्यांच्यावर काल उशिरा वाकीपाडा येथील स्मशान भूमीत अंत्यसंकर करण्यात आले.

# लाचेप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपीक अटकेत

**ठाणे/प्रतिनिधी**

देयकाची रक्कम मंजूर करण्यासाठी दोन टक्के रकमेची मागणी करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपीकाला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. विजय आव्हाड असे या कर्मचाऱ्याचे नाव असून त्याला न्यायालयात हजर केले असता २९ डिसेंबरपर्यंत त्याची पोलीस कोठडी मिळाल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. तक्रारदार यांचे मित्र कंत्राटदार असून त्यांनी तक्रारदाराला कामाचे सर्व अधिकार दिले होते. त्यानुसार तक्रारदार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचा ठेका घेऊन सुमारे १० लाख रुपयांचे काम पूर्ण केले होते. त्याचे देयक तक्रारदाराने काढले होते. या देयकाच्या रकमेवर दोन टक्के याप्रमाणे विजय आव्हाड याने त्यांच्याकडून २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. यामध्ये त्याने स्वत:साठी पाच हजार रुपये आणि विभागातील कार्यकारी अभियंत्याला २० हजार रुपये अशी मागणी केली होती. यानंतर तक्रारदाराने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात तक्रार दाखल केली.

त्याने दिलेल्या तक्रारीनुसार, गुरुवारी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पडताळणी केली असता आव्हाड याने तडजोडीअंती २३ हजार मागितल्याचे समोर आले. त्यानुसार पथकाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात सापळा रचून आव्हाड याला लाच घेताना हातोहात पकडले. त्याच्याविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या घराची झडती घेतली. परंतु त्यामध्ये काही आढळले नाही. त्याला दोन दिवसांची कोठडी मिळाली असून प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उप-अधीक्षक धर्मराज सोनके यांनी दिली.

30 DECEMBER 2024 To 05 JANUARY 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 12/28/2024 8:36 PM Page 1



# '३५ वा वसई तालुका कला क्रीडा महोत्सवा'चे क्रिकेटपट्टू संजय बांगर व निर्माता दिगदर्शक केदार शिंदेंच्या हस्ते उद्घाटन

## 'कला क्रीडा महोत्सवा'ने मुलांना मोबाईलमधून बाहेर काढून मैदानावर आणले -केदार शिंदे





**वसई/प्रतिनिधी**

गेली ३५ वर्षे हा मोहोत्सव सुरू आहे हे मोठे काम असून त्याबद्दल हितेंद्र ठाकूर यांचे अभिनंदन. याठिकाणी एकाच मैदानावर भारतीय मातीतील स्पर्धा होत आहेत. या मोहोत्सवाने मोबाईल मधून काढून मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याचे काम केले आहे. क्रीडा स्पर्धा बरोबरच काला विभागात ही अनेक स्पर्धा होत आहेत आमची सुरुवात ही एककिके मधून झाले आहे त्यामुळे या स्पर्धेमधून येणाऱ्या काळात अनेक कलाकार आणि खेळाडू तयार व्हाव्यात अश्या शुभेच्छाप्रसिद्ध निर्माता दिगदर्शक केदार शिंदे यांनी वसई तालुका कला क्रीडा मोहोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी दिल्या.

वसई तालुक्यातील विद्यार्थी व नागरिक यांच्या कला व क्रीडागुणांना वाव मिळावा व त्यांना कला व क्रीडा क्षेत्रात एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांना प्रोत्साहन व स्पर्धात्मक संधी देण्याच्या हेतूने वसईत यंग स्टार ट्रस्ट पुरसंस्कृत, वसई विरार महानगरपालिका सहकार्याने वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ आयोजित वसई तालुका कला क्रीडा महोत्सवाचे आज मोठ्या जल्लोषात दघाटन झाले क्रीडा विभाचे उदघाटन कसोटी क्रिकेटपट्टू संजय बांगर यांच्या हस्ते तर कला विभागाचे निर्माता दिगदर्शक केदार शिंदे यांच्या हस्ते उदघाटन झाले. या मोहोत्सवाच्या उदघाटनाला नालासोपाराचे आमदार राजन नाईक यांच्यासह माजी आमदार हितेंद्र ठाकूर, माजी आमदार क्षितिज ठाकूर, माजी आमदार राजेश पाटील, वसई विरार शहर महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त रमेश मनाले, माजी खासदार बळीराम जाधव, माजी महापौर अनुक्रमे नारायण मानकर, प्रविण शेट्टी, प्रांत शेखर गाडगे, तहसीलदार अविनाश कोष्टी हे उपस्थित होते. कला विभाग प्रमुख अनिल वाझ यांनी मोहोत्सवाच्या आता पर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. यावेळो मैदानात विविध शाळेतील विद्यार्थ्यांचे संचलन झाल्यावर दुपारी विरार येथून निघालेल्या क्रीडा ज्योतीचे आगमन मैदानात झाले. कार्यक्रमात वसईचे नाव उज्वल करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ...पान ६ वर

# वसईत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तंत्र प्रदर्शन



**वसई/प्रतिनिधी**

संस्था स्तरावरील तंत्रप्रदर्शन वीरांगना झलकारी बाई शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वसई येथे २४ डिसेंबर रोजी घेण्यात आले. या तंत्रप्रदर्शनामध्ये आनंद गदगी संस्थापक बसिन टेक्निकल इन्सिटीट्युट तसेच संपादक वसई वार्ता, आनंद मस्तान संचालक बेसीन कॅथोलिक बँक व नटराज इंटरप्राईजेस याचे संचालक व राजल नाईक राष्ट्रीय अध्यक्ष नारी फाउंडेशनच्या अध्यक्षा, या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होते. संस्थेतील सर्व व्यवसायातील प्रशिक्षणार्थि या तंत्र प्रदर्शनात भाग घेतलेला होता व अनेक नाविन्य असे प्रयोग सादर केले. परीक्षकांनी अनेक सुंदर सूचना व मार्गदर्शन केले तसेच ड्रेस मेकींगच्या क्युआर फॅब्रिक कोड यांना प्रथम क्रमांक, कृषी औषध फवारणी सोलर पंप याला द्वितीय क्रमांक तसेच मल्टीपर्पस चेअर याला तिसरा क्रमांक आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग याला उत्तेजनार्थ क्रमांक देऊन कौतुक केले. या सर्व तंत्र प्रदर्शनास संस्थेतील सहकारी कर्मचारी प्रशिक्षणार्थींनी कार्यक्रम यशस्वी केला.

# जिल्ह्यातील प्रत्येक गावातील कुटूंबाला सक्षम करण्यासाठी शासन कटिबध्द -भरत गोगावले



**पालघर/प्रतिनिधी**

शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचल्या जाणार असून जनतेने रोजगार हमी योजनेंतर्गत येणाऱ्या प्रत्सेक योजनांचा लाभ घ्यावा. त्यासाठी गावातील प्रत्येक कुटूंब सक्षम करण्यास शासन कटिबध्द आहे, असे प्रतिपादन रोजगार हमी व फलोज्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी विक्रमगड तालुक्यातील खोमारपाडा येथे आज केले. या कार्यक्रमास खासदार डॉ.हेमंत सवरा, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, आमदार हरिश्चंद्र भोये, आमदार राजेंद्र गावित, मनरेगा मिशनचे महासंचालक नंदकुमार वर्मा, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजया जाधव, खोमारपाडा गावचे सरपंच विलास गहला आदि व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी गोगावले म्हणाले की, पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. खोमारपाडा या छोट्याशा गावाने एक आदर्श निर्माण केला आहे. खोमारपाडा हे मॉडेल म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात विविध योजना राबविण्यात येणार आहे. यावेळी मंत्री गोगावले यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विक्रमगड तालुक्यातील नंदादीप समृध्द गाव खोमारपाडा येथे केलेल्या विविध योजनांच्या कामाची पाहणी केली. तसेच विविध लाभार्थ्यांशी संवाद साधला. याठिकाणी गांडूळखत, मोगरा लागवड, शेततळे, बांबू लागवड अशा विविध योजना या ठिकाणी उत्तमरित्या राबविल्या आहेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी मंत्री गोगावले यांच्या हस्ते जलतारा या ...पान ६ वर

# चर्मकार समाजाचा उत्कर्ष शिक्षणामुळे -संदेश जाधव

**वसई/प्रतिनिधी**

चर्मकार समाजाचा उत्कर्ष हा शिक्षण आणि शिक्षकांमुळे झाला आहे. शिक्षणामुळे आज समाजातील लोक वेगवेगळ्या ठिकाणी समाजाचे नाव मोठे करत असल्याचे प्रतिपादन संत रोहिदास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संदेश जाधव यांनी संस्थेच्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेट केले. हि सभा समाज उन्नती मंडळ, माणिकपूर येथे संपन्न झाली. संस्थेचे अध्यक्ष संदेश जाधव व कार्यकारी मंडळ सदस्यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून कामकाज सुरू झाले.




यावेळी अध्यक्ष संदेश जाधव यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात संस्थेच्या कामाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी सांगितले कि, २०२३-२४या कालावधीतील संस्थेने अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. ज्यात युवा-युवती मार्गदर्शन शिबीर, वधु-वर सुचक मेळावा, सेवानिवृत्त व सेवेतील शासकीय अशासकीय उच्चपदस्थ व्यक्तींच स्नेह शिबीर व कल्याण, ठाणे, भिवंडी, शहापूर क्षेत्रातील समाज बांधवांची स्नेह सभा पद्मश्री पी.डी.जाधव शिक्षण संकुल, भिवंडी यांचा आढाव घेत आदर्श शिक्षक राज्यस्तरीय व तालुकास्तरिय शिक्षक, पुरस्कार प्राप्त लेखक यांचा उल्लेख करून त्यांच अभिनंदन केले, त्याच प्रमाणे सामाजिक विविध कार्यक्रमास आर्थिक सहाय्य करणाऱ्या दानशूर व्यक्तींचे आभार मानले,वरोर येथील समाज मंदिर वास्तु लोकार्पण, समाज मंदिर, एडवण भूमीपूजन व आर्थिक मदतीसाठी झालेला मराठी बाणा कार्यक्रम, रोहिदास प्रिमियर लिग, क्रिकेट सामने, यांचा उल्लेख केला, यावेळी संत रोहिदास भवन उभारण्यासाठीचा संकल्प करण्यात आला. त्या करिता जागा उपलब्ध करणे, संस्थेचा रौप्य ...पान ६ वर


# डॉ. बाबासाहेबांबद्दल अपमानकारक शब्द वापरल्या प्रकरणी वंचित बहुजन आघाडीचे तीव्र आंदोलन; गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी



**पालघर/प्रतिनिधी**

देशाचे केंद्रीय गृहराज्यमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल अपमानकारक शब्द वापरल्याबद्दल वाचावी अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध तसेच त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नालासोपारा संयुक्त नगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ तीव्र आंदोलन करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशाने यावेळी निश्चित आंदोलनासह स्त्री मुक्ती आणि मनुस्मृती दहन आंदोलन यावेळी आंदोलकांकडून करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे वसई विरार महापालिका क्षेत्राचे अध्यक्ष संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील शेकडो पदाधिकारी आंबेडकरवादी पदाधिकाऱ्यांनी त्या आंदोलनात सहभाग घेत आपला निषेध नोंदविला. घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांबद्दल अपमान करत वक्तव्य करणाऱ्या कधीकाळी तडीपार असलेल्या देशाचे गृहमंत्री अमित शहा यांना गृहमंत्री पदावर बसण्याचा काहीच अधिकार नाही, त्यांनी केलेल्या वक्तव्याची माफी न मागता त्वरित आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी वंचितचे संजय पवार यांनी यावेळी भाषणात केली. यावेळी पक्षाचे जिल्हा प्रभारी सुप्रेश खैरे साहेब, महिला आघाडीच्या वसई विरार महिला आघाडीच्या गीताताई जाधव, प्रेरणाताई बेकरे, सुधाकर इंगळे साहेब, नालासोपारा शहराध्यक्ष दयानंद गमरे साहेब, संघटक आनंद प्रमुख साहेब मिलिंद कांबळे साहेब, उपाध्यक्ष सुमित पवार, पक्षाचे माजी अध्यक्ष सुशांत पवार साहेब हे उपस्थित होते.

# लातूरमधील बुधोडा येथील सोयाबीनची थप्पी जळून खाक



**औसा/प्रतिनिधी**

तालुक्यातील बुधडा येथील शेतकऱ्यांने सोयाबीनची रास करून ठेवलेल्या पोत्यांना अचानक शॉर्टसर्किट मुळे आग लागल्याने सोयाबीनची थप्पी जळून खाक झाली आहे. या आगीत शेतकऱ्याचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. बुधोडा येथील शेतकरी प्रेम कुमार नरवडे यांच्या सर्वे नंबर ६८ मधील शेतामध्ये खरीप हंगामातील सोयाबीन भरडून पोत्यात भरून पत्र्याच्या शेडमध्ये थप्पी लावली होती. शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास शेतातील पत्र्याच्या शेड ला विद्युत ताराचे शॉर्टसर्किट होऊन आग लागली या आगीमध्ये प्रेम कुमार नरवडे यांच्या पत्र्याच्या शेड मधील जवळपास २०० कट्टे सोयाबीन आगीच्या भस्म सात झाले. दरम्यान बुधोडा सज्जाचे तलाठी भागवत सोनवते यांनी घटनास्थळी जाऊन जळालेल्या सोयाबीनच्या नुकसानीची पाहणी करून पंचनामा अहवाल सादर केला आहे प्रेम कुमार नरोडे यांच्या शेतातील सोयाबीन जळाल्यामुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# उत्कृष्ट सरपंच म्हणून भरत हजारे यांचा गौरव



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील खानिवली ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच भरत हजारे हे निवडून आल्यापासून सतत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून ग्रामपंचायतीचे नाव महाराष्ट्रामध्ये नावारूपाला आणित आहेत. गेल्या दोन वर्षापासून गावाचा शास्वत आणि पायाभूत विकास करण्यासाठी धडपडत आहेत. दोन वर्षामध्ये गावात अनेक विकासकामे केली असून ग्रामपंचायतीला पुरस्कार मिळवून दिला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वातावरणीय व पर्यावरणीय बदल विभागाचे माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये खानिवली ग्रामपंचायतीला कोंकण विभागाचे ५० लाखाचे प्रथम पारितोषिक मिळाले असून आता ग्रामपंचायत राज्यात स्पर्धा करीत आहे. ग्रामपंचायतीमध्ये घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी प्लॅस्टिक बॉटल क्रशिंग मशीन असुन त्या माध्यमातून २ महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे. गावातील तलावाचे अमृत सरोवर मध्ये रूपांतर केले असुन अतिशय सुंदर आणि दिखावदार बनवले आहे. गावात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून महिलांना रोजचा रोजगार दिला जातो. भरत हजारे हे स्वतः यशदा पुणे या शासकीय संस्थेचे प्रविण प्रशिक्षक असुन त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सरपंच यांना प्रशिक्षण देण्याचे काम केले जाते. पंचायत राज प्रशिक्षण संस्थेचे सुद्धा ते प्रविण प्रशिक्षक आहेत. पेसा विषयाचे ते अभ्यासक असुन त्यांना पेसा कायद्याचा चांगला अभ्यास आहे. याची दखल घेऊन पंचायत समितीने यावर्षी पेसा दिनाच्या निमित्ताने सरपंच भरत हजारे यांना उत्कृष्ट सरपंच म्हणून पुरस्कार देण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी वैभव शिंदे, विस्तार अधिकारी वसंत अहिरे,विस्तार अधिकारी नितिन मोकाशी, कृषि विस्तार अधिकारी गायकवाड, तालुका पेसा समन्वयक महेश भोईर, तालुक्यातील सरपंच, पेसा मोबिलायझर उपस्थित होते.

# डॉ.प्रणव तत्तापुरे एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण



**अहमदपूर/फिरोज शेख**

मध्य प्रदेशाची राजधानी असलेल्या भोपाळ येथील अखिल भारतीय आर्युविज्ञान संस्थान, भोपाळ च्या वतीने माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एमबीबीएसच्या फायनल इयरच्या परीक्षेत डॉ. प्रणव रामलिंग तत्तापूरे यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. कालच त्याचा निकाल घोषित करण्यात आला असून त्यामध्ये १४५६ गुण घेऊन यशस्वी झाला आहे. पुढील वैद्यकीय प्रशिक्षणासाठी भोपाळच्या एम्स संस्थेत एक वर्षासाठी अधिकृतपणे नेमणूक देण्यात आली आहे. यशवंत विद्यालयाचे पर्यवेक्षक राम तत्तापुरे आणि संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे तत्तापुरे यांचा चिरंजीव असून अहमदपूर तालुक्यातील तो (AIIMS) एम्स भोपाळ चा पहिला विद्यार्थी आहे. त्याच्या या नेत्र दीपक यशाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अशोकराव सांगवीकर, सचिव शिक्षण महर्षी डी बी लोहारे गुरुजी, श्री गणेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गणेश दादा हाके पाटील, सचिव तथा प्राचार्या रेखाताई तरडे, भक्ती स्थळाचे प्रमुख प.पू. आचार्य गुरुराज स्वामी यांच्यासह मित्र परिवारांनी अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

# मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील क्षेत्रात अंमली पदार्थाचे वाढते व्यापार

## वर्षभरात ४० किलो ड्रग्ज, ११ कोटींचा माल जप्त

**वसई/प्रतिनिधी**

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने गेल्या ११ महिन्यांत ३२ प्रकरणांमध्ये ४० किलो ड्रग्ज जप्त केले असून ११ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणांत आतापर्यंत ६२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यातील अनेक आरोपी गुजरात, मध्यप्रदेश आणि बिहार येथील रहिवाशी आहेत. आकडेवारीनुसार आयुक्तालयाचा परिसर मादक पदार्थांच्या वेळच्या सापडल्याचे दिसून येते. दाखल होणाऱ्या केसेसच्या तुलनेत दाखल न होणारी प्रकरणे किती असतील? पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मिरा-भाईंदर आणि वसई- विरार उपनगरांना ड्रग्ज साठवणूक व वितरणासाठी लक्ष्य केले जात असल्याची माहिती आहे. अँटी नॉर्कोटिक्स सेलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, अटक करण्यात आलेल्यापैकी बहुतांश आरोपी स्थानिक असून काही गुजरात, मध्यप्रदेश आणि बिहार येथून आले आहेत. नेपाळमार्गे बिहार आणि देशभर ड्रग्जचे वितरण केले जात आहे. दरम्यान मिरा-भाईंदर आणि वसई-विरार उपनगरात येणारे उच्च मूल्य असलेली ड्रग्ज, चरस, गांजा हे नेपाळमार्गे बिहारातून भारतात आणली जातात आणि देशभर वितरित केली जातात. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जमध्ये एमडी (मेफेड्रोन), चरस, कोकेन, हेरॉईन आणि गांजाचा समावेश आहे. यासंदर्भात मुंबईतून पाच आरोपींना अटक करून ३ किलो चरस जप्त करण्यात आले, जे नेपाळमार्गे बिहारातून आणण्यात आले होते. त्याशिवाय मध्यप्रदेशातील तीन आरोपींना चरससह अटक करण्यात आली होती. तसेच ठाणे आणि गुजरात येथून दोन आरोपींना अटक करण्यात आली, ज्यांच्याकडून १,४०० बाटल्या कोरेक्स कफ सिरप जप्त करण्यात आले होते. ११ महिन्यांत अटक करण्यात आलेल्या ६२ आरोपींपैकी १२ नायजेरियन नागरिक असून ते मिरा-भाईंदर व नालासोपारा येथून अटक करण्यात आले आहेत. नयानगर येथील एका प्रकरणात १.५ कोटी रुपयांचे कोकेन जप्त करण्यात आले होते, ज्यात दोन नायजेरियन नागरिकांना अटक करण्यात आले. तसेच दि. १० डिसेंबर रोजी वसईतील अचोळे



पोलीस ठाण्याने रात्री गस्त घालताना एका परदेशी नागरिकाला एमडी ड्रग्जसह अटक केली. त्याच्याकडून ३१ लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले. त्यावर एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला. गेल्या ११ महिन्यांत ४० किलो ड्रग्ज बाजारात पोहोचण्यापासून पोलिसांनी रोखली आहेत. आरोपींना पकडण्यासाठी आणि त्यांच्या पुरवठा साखळी नष्ट करण्यासाठी भारतभर नियोजन व कार्यवाही करावी लागते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मदतीने परिसर ड्रग्ज मुक्त ठेवण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. तसेच नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर अशा स्वरूपाचे विक्री व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढतात त्यावर निर्बंध आणणे गरजेचे आहे.